।।श्री।।

महाराष्ट्र सेवा संघाच्या वार्षिक अहवालासाठी अध्यक्षीय मनोगत लिहिण्याची माझी ही १२ वी वेळ! या लेखनात कदाचित तोच तोच पणा येण्याची शक्यता असतेच. मात्र म.से.संघात सतत इतके नवनवीन आणि चांगले घडत असते की हे काम थोडे सोपे बनते. आनंद आणि अभिमान तर वाटतोच. सन २०१६ मध्ये आपण 'सॅल्यूट इंडिया' च्या नौदल प्रदर्शनातून समुद्राची खोली मोजली; तर सन २०१७ मध्ये 'वायुशक्ती'प्रदर्शनातून आकाशाला गवसणी घातली. वायुदलाच्या सहकार्याने आयोजिलेल्या या भव्य प्रदर्शनाला तीन दिवसांत १३,००० नागरिकांनी भेट दिली. त्यात ५ ते ६ हजार विद्यार्थी होते. एअर व्हाइस मार्शल श्री. फर्नांडिस यांनी संस्थेची स्तुती करणारे पत्र लिहिले आहे. ते या अहवालात छापले आहे. अहवाल वर्षात संस्थेची ८० वर्षे पूर्ण झाल्याने मुलुंड आणि ऐरोली या दोन्ही ठिकाणी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सर्व विभागांचे काम उत्तमपणे सुरू आहेच. त्याचप्रमाणे नेहमीचे पुरस्कार सोहळे, भव्य गिरिमित्र संमेलन, ऐरोली म.बा. देवधर संकुलाच्या नूतनीकरण केलेल्या सुंदर वास्तूतील कार्यक्रम हे सगळे लोकांच्या कौतुकास पात्र होतेच; पण त्यामुळे लोकांच्या अपेक्षाही खूप उंचावलेल्या आहेत. दृष्टिसेवा केंद्रातून दहावीची शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या काही दृष्टिबाधित विद्यार्थ्यांनी शिक्षण पुढे सुरू ठेवून पदवीची मजल गाठली आहे! धर्मादाय दवाखाना, फिजिओथेरपी केंद्र, ज्ञानेश्वर पुस्तक पेढी, अभ्यासिका हे सेवा-प्रधान उपक्रम कार्यकर्त्यांना समाधान आणि संस्थेला गौरव प्राप्त करून देतात. 'प्रेरणा पुरस्कार' यंदा लढताना अपंगत्व आलेल्या आणि तरी सकारात्मक विचाराने कार्यरत आणि उत्साही असलेल्या सैनिकांना दिला गेला हे विशेष उल्लेखनीय.

गोरेगाव येथे राहणारे श्री. सुधाकर आठले यांनी तीन वर्षांपूर्वी ते ९४ वर्षाचे असताना संस्थेला रुपये साडेसात लाखाची देणगी दिली होती.संस्थेचे कार्य आणि प्रगती पाहून त्यांनी नुकतेच आणखी आठ लाख रुपये देणगी स्वरूपात दिले, वयाच्या ९७ व्या वर्षी! त्यांचे विशेष आभार आणि त्यांच्या दातृत्वाला अभिवादन. इतर अनेकांनी भरीव देणग्या यावर्षी दिल्या.

सारांश, गुणवत्ता, विविधता, संख्या, सातत्य, पारदर्शिता, आणि विश्वासार्हता ही संस्थेची वैशिष्ट्ये संस्थेच्या कीर्तीत भर टाकत आहेत. 'व्हॉट्स अप' अर्थात् पर्यावरण स्नेही हरित सदस्यांची संख्या वाढत असल्यामुळे संस्थेच्या कार्यक्रमांची माहिती हजारो रसिकांपर्यंत पोहोचत आहे.

सर्व कार्यकर्त्यांचे आणि उत्साहाने सक्रिय पाठिंबा देणाऱ्या सर्व रसिकांचे मनापासून अभिनंदन. या संस्थेशी रसिक आणि कार्यकर्ते म्हणून जोडले जाणे हे प्रत्येकाचे जीवन समृद्ध करणारे ठरेल. सर्वांनी प्रेमाने एकत्र येऊन भव्य -दिव्य कार्य करू या हे आवाहन या निमित्ताने करतो.

''शुभं भवतु''

...चंद्रशेखर वझे



Ahval text18.indd 1 2/2/2019 4:43:00 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

## विश्वस्त मंडळ

श्री. चंद्रशेखर ना. वझे (अध्यक्ष - पदसिद्ध)
डॉ. आनंद रा. कट्टी
श्री.अजित ग. करंदीकर
श्री. उल्हास कृ. हंबर्डे
श्री. रमेश दे. धामणकर
श्री. किरण रा. देशमुख

## कार्यकारी मंडळ

**पदाधिकारी**

श्री.चंद्रशेखर ना. वझे -अध्यक्ष
श्री.चंद्रशेखर. म. कुलकर्णी–उपाध्यक्ष
श्री.जयप्रकाश र. बर्वे -- कार्यवाह
श्री.धनंजय दि. दिवेकर- कोषाध्यक्ष
श्री.विनोद म. सौदागर - सहकार्यवाह
श्री.अरुण मो. भंडारे-सहकार्यवाह
श्री. प्रकाश ह. सडेकर-सहकोषाध्यक्ष

## सदस्य

श्री.रवींद्र द. लाड
श्री.प्रदीप र. सप्रे
श्री.विनायक ज. जोगळेकर
श्री. विजय वा. वझे
श्री. सतीश श्री. पाटणकर
श्री. अवधूत पं. गोळे
श्री. शंकर गो. वीरकर
(स्वीकृत १२.८.१७पासून)
श्री. किशोर पेंढरकर
(स्वीकृत १२ .८.१७पासून)
श्री. नितीन देशपांडे
(स्वीकृत १२.८.१७पासून)

## ऐरोली व्यवस्थापन समिती

श्री. प्रदीप र. सप्रे - अध्यक्ष
श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह
श्री. किशोर पेंढरकर -कोषाध्यक्ष
श्री. सुधीर बागाईतकर -सहकार्यवाह
श्री. चंद्रशेखर ना. वझे (पदसिद्ध)
श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध)

## मानद अंतर्गत हिशेब तपासनीस

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्रीमती ज्योत्स्ना जोशी (ऐरोलीसाठी)

## हिशेब तपासनीस

मेसर्स सिंगवी, ओतूरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)



Ahval text18.indd 2 2/2/2019 4:43:03 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब : व्यवस्थापक — श्रीमती सुमिता पवार

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. मोहन पवार — श्री. श्रीरंग भाष्टे

श्री. भास्कर इंगळे — श्री. दिनेश रसाळ

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

कु. श्रद्धा कांबळे - ग्रंथपाल

श्रीमती आरती रणदिवे — श्री. योगेश मोडक

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय सेवक वर्ग**

श्री. प्रदीप वाईकर — श्री. उमेश काणेकर

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती प्रियांका शाळीग्राम (व्यवस्थापक) — श्रीमती कविता मोढवे

श्रीमती रुपाली शिंदे — कु.सुप्रिया सहाणे

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. रमेश झोंबाड — श्री. शंकर शिंगोटे

श्री. सुरेंद्र राणे — श्री. शिवाजी पिसाळ

---

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**

म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०

दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५

e-mail: mss_mulund@rediffmail.com

Web Site: www.mssmulund.com

**ऐरोली शाखा**

म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,

ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८

दूरध्वनी : ०२२-२७७९१८३७/ २७७९०८३६

e-mail : mss.airoli@rediffmail.com

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)
मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८) रविवार, दि. १२ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ५.३० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील कामे

१. दि. १२.८.२०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्त कायम करणे.
२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०१७-१८ सालच्या अहवालास मान्यता देणे.
३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०१७-१८ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.
४. २०१८-१९सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.
५. २०१८-१९ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. २०१८-१९ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.
७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.
८. घटना कलम १८(९) नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या अध्यक्षाची जागा भरणे.
९. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ४ सदस्यांच्या जागा भरणे.
१०. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

### विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. ३० जुलै २०१८ ते बुधवार, दि.८ऑगस्ट २०१८ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत (सुटीचे दिवस सोडून) कार्यालयांत पाहण्यास मिळतील.
३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि.९ ऑगस्ट २०१८ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.
४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.
५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.
६. अध्यक्षपदावरून श्री. चंद्रशेखर वझे निवृत्त होत आहेत. तसेच कार्यकारी मंडळातून सर्वश्री ज. र. बर्वे, अ.मो. भंडारे, वि. म. सौदागर, व र.द. लाड निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.



Ahval text18.indd 4 2/2/2019 4:43:03 PM

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री प्रभाकर रामचंद्र दामले, श्री. सदाशिव पोतदार व नंदिनी उल्हास हंबर्डे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. श्री. प्रभाकर रामचंद्र दामले निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. अध्यक्ष तसेच कार्यकारी मंडळातील ४ जागांसाठी निवडणूक रविवार, दि.१२ ऑगस्ट २०१८ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०१८ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल. (सभासद क्र. आजीव९५८पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २९ जुलै २०१८ ते ७ ऑगस्ट २०१८ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.८ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे. नामांकन पत्रांची छाननी दि. ८ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ७.३० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ८ ऑगस्ट २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि.९ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.१० ऑगस्ट २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. १९ जुलै २०१८ — जयप्रकाश बर्वे (कार्यवाह)

**टीप : सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.**

## ऋणनिर्देश

मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्रवाहिन्या, सर्व वार्ताहर, आय.डी.बी. आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; स्टेट बँक ऑफ इंडिया, अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंदासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, कामत बॅन्क्वेटस् चे श्री. सतीश कामत , वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कं. मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी, श्रीमती ज्योत्स्ना जोशी, श्री. माधव शिरवळकर, 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्री. अशोक पानवलकर, श्री. विलास परुळेकर, श्री.समीर कर्वे, 'लोकसत्ता' चे श्री. विकास महाडिक, 'सकाळ' चे संपादक श्री. विजय पात्रूडकर, श्री. आनंद मते, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालय व ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश बर्वे (कार्यवाह) — चंद्रशेखर वझे (अध्यक्ष)

**टीप -**

अहवाल अद्ययावत करण्यासाठी त्यात संस्थेतील ३० जून २०१८ पर्यंतच्या घडामोडी देण्यात आल्या आहेत याची कृपया नोंद घ्यावी. आर्थिक नोंदी मात्र ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या आहेत.



Ahval text18.indd 5 2/2/2019 4:43:03 PM

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा →** | **१** | **५** | **९** |
| १ | श्री. चं.ना.वझे | १ | ५ | ९ |
| २ | श्री.आ.रा. कट्टी | १ | ३ | - |
| ३ | श्री.र.दे. धामणकर | १ | ४ | – |
| ४ | श्री.अ.ग. करंदीकर | १ | ३ | - |
| ५ | श्री. उ.कृ.हंबर्डे | १ | ५ | – |
| ६ | श्री. कि.रा. देशमुख | १ | ४ | - |
| ७ | श्री.चं.म.कुलकर्णी | - | ४ | ८ |
| ८ | श्री.ज.र.बर्वे | १ | ५ | ९ |
| ९ | श्री.ध.दि.दिवेकर | - | २ | ५ |
| १० | श्री.र.द.लाड | - | ५ | ८ |
| ११ | श्री.अ.मो.भंडारे | - | ५ | ७ |
| १२ | श्री.वि.म. सौदागर | - | ५ | ८ |
| १३ | श्री. प्र.र. सप्रे | - | ४ | ३ |
| १४ | श्री.वि.ज.जोगळेकर | - | ४ | ३ |
| १५ | श्री.वि.वा.वझे | - | ४ | ८ |
| १६ | श्री.स.श्री.पाटणकर | - | ५ | ६ |
| १७ | श्री. अ.पं. गोळे | - | ५ | ८ |
| १८ | श्री.प्र.ह.सडेकर | - | ५ | ७ |
| १९ | श्री.सु.वा. बागाईतकर | - | ३ | ४ |
| २० | श्री.शं.गो.वीरकर | - | ५ | ६ |
| २१ | श्री. नितीन देशपांडे | - | ५ | ६ |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे सभागृहाच्या भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च१७अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च १७ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | ७ | - | - | ७ |
| आधारस्तंभ | १३ | - | - | १३ |
| आश्रयदाते | ५ | - | - | ५ |
| पत्ता माहीत नसलेले | ८१ | - | - | ८१ |
| आजीव | ८४९ | ८ | १ | ८५६ |
| **एकूण** | **९५५** | **८** | **१** | **९६२** |

**अहवाल वर्षी सांस्कृतिक सभासद - मुलुंड येथे २२४ / ऐरोली येथे -३५**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम - **मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभांगण | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ४५पू | ४४स<br>संस्था २९ | ३०दिवस | १८पू<br>२२ स<br>२४ संस्था |

**ऐरोली वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ वातानुकूलित | सभागृह क्र.१ बिगर वातानुकूलित | तळमजला | सभागृह क्र.२ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ९पू/ १०स | १७पू/ ११स | ९स | ८वातानुकूलित<br>४० बिगर वातानुकूलित |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार,

**श्रद्धांजली :**

श्री. गजानन रामचंद्र फाटक (आजीव १५६) यांचे अहवाल साली निधन झाले.



संस्थेच्या 'सॅल्यूट इंडिया' उपक्रमाचे आधारस्तंभ व भारतीय नौदल या विषयातील तज्ज्ञ डॉ. सचिन पेंडसे यांचे अहवालसाली अकस्मिक निधन झाले.

तसेच रीमा लागू (अभिनेत्री), मधुकर तोरडमल (ज्येष्ठ अभिनेते, लेखक, चित्रपट निर्माते व दिग्दर्शक) , उमा भेंडे (अभिनेत्री), शशी कपूर (चित्रपट अभिनेता, दिग्दर्शक), श्रीदेवी (अभिनेत्री), शिरीष पै (लेखिका) , टॉम आल्टर (सिने अभिनेता) यांचे अहवालसाली निधन झाले, अशा सर्वांना महाराष्ट्र सेवा संघ परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली!

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या**

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| | | |
| **गिरिमित्र संमेलनासाठी** | | |
| १ | अलाईड सेफ्टी इक्विपमेंट्स (प्रा.) लि. | १८,०००.०० |
| २ | प्रॉडक्ट प्रमोशन्स (श्री भरत वखारिया) | २५,०००.०० |
| ३ | पगमार्क (श्री. रवि वैद्यनाथन) | २०,०००.०० |
| ४ | श्री. मिलिंद महादेव जोशी | १०,०००.०० |
| ५ | श्री. रवींद्र अनंत पाटील | १,००,०००.०० |
| ६ | स्टेट बँक ऑफ इंडिया | ५०,०००.०० |
| ७ | श्रीमती नीलिमा सुनील कुलकर्णी | १,००,०००.०० |
| ८ | शापूरजी पालनजी | ७५,०००.०० |
| ९ | इतर देणग्या | २३,०००.०० |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सविता गद्रे (सु.ल. गद्रे पुरस्कारांसाठी) | १,५०,०००.०० |
| २ | श्री. अरविंद वामन जोग | ११,००१.०० |
| ३ | श्री. चंद्रशेखर ना. वझे | १०,००१.०० |
| ४ | श्री सचीन केळकर | १०,००१.०० |
| ५ | श्री. भरत रामचंद्र अनिखिंडी | ३७,५००.०० |
| ६ | रा. वि. ढेरे कार्यक्रमासाठी देणग्या | ४७,०००.०० |
| ७ | इतर देणग्या | ७,२०,२२४.०० |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | २५,०००.०० |
| २ | श्री. राजाराम सूर्याजी खामकर | २,५००.०० |
| ३ | ज्ञानेश्वर पुस्तक पेढीसाठी - अंजली जोशी | ५,०००.०० |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती अपर्णा नायगावकर | २०,०००.०० |
| २ | लखनवी चिकन हँडीक्राफ्ट | २०,०००.०० |
| ३ | इनर व्हील क्लब ऑफ हीरानंदानी इस्टेट | ३२,०००.०० |
| ४ | श्री. अनंत रघुनाथ वीरकर | ५०,०००.०० |
| ५ | श्री. दीपक वासंदानी | १६,०००.०० |
| ६ | श्रीमती कांचन नायक | १२,१००.०० |
| ७ | श्रीमती साधना रामदास शिंदे | २१,०००.०० |
| ८ | श्रीमती सिंधू डांगे | १०,०००.०० |



Ahval text18.indd 8 2/2/2019 4:43:04 PM

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. भरत रामचंद्र अनिखिंडी | ५०,०००.०० |
| १० | श्रीमती अपर्णा परब | १०,०००.०० |
| ११ | श्री. हेमचंद्र किसन नेमाडे | १०,०००.०० |
| १२ | श्री. प्रसाद भिडे | १०,०००.०० |
| १३ | इतर देणग्या | ७५,१२९.०० |
| **अर्थ विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | | ५,०००.०० |
| **संस्कृत विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | सुमंगल प्रेस (प्रा.) लिमिटेड | ५१,०००.०० |
| २ | इतर | ४,००१.०० |
| **सॅल्यूट इंडिया** | | |
| १ | श्री. अनंत रघुनाथ वीरकर | ५०,०००.०० |
| २ | अल्कॉन इंडस्ट्रीज | १०,००१.०० |
| ३ | डी.के. कंस्ट्रक्शन | ५०,०००.०० |
| ४ | श्री. भरत रामचंद्र अनिखिंडी | १२,५००.०० |
| ५ | श्री. गोपाळ धुंडीराज चिपळूणकर | १०,०००.०० |
| ६ | श्री. विवेकानंद मनोहस पत्की | १०,०००.०० |
| ७ | श्री. सुधीर हणमंते | १०,०००.०० |
| ८ | श्री. प्रशांत सकपाळ | २५,०००.०० |
| ९ | श्री. सुहास सहस्त्रबुद्धे | १०,०००.०० |
| १० | श्री. महेश पटेल | २५,०००.०० |
| ११ | श्री. संजय कृष्णा हेगडे | १०,०००.०० |
| १२ | श्री. किरण रामचंद्र देशमुख | ५०,०००.०० |
| १३ | रिफेअर इंडस्ट्रीज | ५०,०००.०० |
| १४ | श्री साई इंटरप्रायझेस | १५,०००.०० |
| १५ | श्री. सतीश पाटणकर अँड असोसिएट्स | २०,०००.०० |
| १६ | श्री. भालचंद्र विष्णू जोशी | १०,०००.०० |
| १७ | दि ठाणे जनता सहकारी बँक लि. | ५०,०००.०० |
| १८ | झायडस हेल्थ केअर लि. | ५०,०००.०० |
| १९ | जयगोविंद इंटरप्रायझेस | ११,०००.०० |
| २० | रेमंड लिमिटेड | ५०,०००.०० |
| २१ | कल्याण जनता सहकारी बँक | १०,०००.०० |
| २२ | जनता सहकारी बँक, पुणे | १०,०००.०० |
| २३ | जनकल्याण सहकारी बँक | २५,०००.०० |
| २४ | इतर देणग्या | १,०४,६०२.०० |

## संस्थेने दिलेल्या देणग्या

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था | ५,०००.०० |
| २ | सह्याद्री मानव सेवा मंच, ठाणे | १०,०००.०० |
| ३ | स्वा.वि.दा. सावरकर समिती, मुलुंड | ५,०००.०० |
| ४ | स्वा. सावरकर साहित्य अभ्यास मंडळ, मुंबई | १०,०००.०० |
| ५ | बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन | १०,०००.०० |
| ५ | इतर | ३३,०००.०० |
| | | |

## महाराष्ट्र सेवा संघाचे श्रीमती सविता गद्रे पुरस्कृत विविध पुरस्कार व इतर कार्यक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २४ सप्टेंबर २०१७ | महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार | मतिमंदांसाठी कार्यरत असलेल्या 'अमेय पालक संघटना ' या खोणी, डोंबिवली येथील संस्थेला हा पुरस्कार देण्यात आला. या संस्थेचे संस्थापक सदस्य अविनाश बर्वे, अध्यक्ष - मुकुंद जोशी , कार्यवाह - रवींद्र बोरगावकर यांच्याशी मानसी आमडेकर यांनी संवाद साधला. रामनारायण रूईया कॉलेजचे प्राचार्य श्री. सुहास पेडणेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. |
| २ | १४ जानेवारी २०१८ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार | पुरस्कारप्राप्त साहित्यिक विनोद आणि उपहासगर्भ लेखन तसेच स्तंभलेखन करणारे श्री. मुकुंद टांकसाळे प्रमुख पाहुणे. सुप्रसिद्ध नाटककार अभिनेते - दिग्दर्शक - सतीश आळेकर. मुलाखतकार - अमृता मोरे |
| ३ | ११मार्च २०१८ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे कलाकार पुरस्कार | पुरस्कारप्राप्त कलाकार मान्यवर संगीतकार आणि संगीत संयोजक अप्पा वढावकर . प्रमुख पाहुणे - डॉ. विद्याधर ओक, वैद्यकशास्त्रातील डॉक्टर, संगीत संशोधक आणि अचल संवादिनी वादक<br>सांगीतिक मुलाखत : श्रेयसी वझे मंत्रवादी. सहभागी कलाकार - माधुरी करमरकर, मंदार आपटे आणि ५ वादक. |
| **नियमित व इतर कार्यक्रम** | | | |
| ४ | २८ एप्रिल २०१८ | सुनीता म.देवधर पुरस्कृत सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार | पुरस्कारप्राप्त स्त्री सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती चेतना गाला-सिन्हा, प्रमुख पाहुण्या श्रीमती किरण मोघे, सुसंवादिका- संपदा वागळे, सूत्रसंचालन - श्रेयसी वझे-मंत्रवादी |



Ahval text18.indd 10 2/2/2019 4:43:04 PM

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | १० फेब्रुवारी २०१८ | महाराष्ट्र सेवा संघाचा प्रेरणा पुरस्कार | मानकरी होते अमोल बोरीवाले आणि एम्. अँथनीदास परेरा. सारस्वत को. ऑप. बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर हे प्रमूख पाहुणे, पॅराप्लेजिक रिहॅब सेंटर, खडकीचे अधिकारी लेफ्टनंट कर्नल बाबूलाल भार्गव हे विशेष अतिथी, सुसंवादक : पत्रकार समीर कर्वे आणि दीपश्री आपटे, सूत्रसंचालन दीपाली केळकर |
| ६ | ४ मार्च २०१८ | गणेश केशव करंदीकर उद्योजक सन्मान | पुरस्कारप्राप्त उद्योजक १)'आजी केअर' संस्थेचे संचालकः प्रसाद भिडे, २)'बिग बिझिनेस ॲडव्हायझर्स' या वित्तीय व्यवस्थापन सल्लागार कंपनीचे प्राजक्ता आणि मकरंद पाटील, ३) प्रिझम सर्जिकेअरचे प्रियाल नागरे आणि रोहन नागरे |
| ६ | ९ व १० जुलै २०१७ | १५ वे गिरिमित्र संमेलन | |
| ७ | १९ जुलै २०१७ | वर्षा सहल | |
| ८ | १५ ऑगस्ट २०१७ | झेंडा वंदन | |
| ९ | सप्टेंबर २०१७ | गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी सन्मान सोहळा, रोटरी क्लब ऑफ मुलुंड व अपना बाजार,मुलुंड(प.) यांच्या संयुक्त विद्यमाने | |
| १० | **१८ नोव्हेंबर, २०१७** | पं. लाटकर शास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार | **सन्मानमूर्ती : डॉ. अंजली पर्वते, प्रमुख पाहुण्या - डॉ. उमा वैद्य** |
| ११ | १८ नोव्हेंबर २०१७ | स्व. उद्धवराव त्रिविक्रम आठले स्मरणार्थ संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार | **डॉ. सौ. आशा गुर्जर, सौ. संगीता आंभोरे** |
| १२ | १६ नोव्हेंबर २०१७ | सु. ल. गद्रे स्मृतिदिना निमित्त - | पंचतुंड नररुंड मालधर, सादरकर्ते :पं.प्रदीप नाटेकर, अर्चना कान्हेरे, सुसंवादक : चंद्रशेखर वझे |
| १३ | २० नोव्हेंबर २०१७ | कलास्वाद मंडळ | |
| १४ | २१ फेब्रुवारी २०१७ | अशोक सहस्त्रबुद्धे स्मृतिप्रीत्यर्थ | |
| १५ | २१ जानेवारी २०१८ | संगीत महोत्सव | कलाकार : आनंद काशीकर (बासरी), पं. कैवल्यकुमार (गायन) |
| | | **वर्धापनदिन सोहळा** | |
| १६ | १४ ऑक्टोबर २०१७ | सहस्त्रचंद्रदर्शन : पुष्प दुसरे | बहुरंगी कार्यक्रम |
| १७ | १५ ऑक्टोबर २०१७ | वर्धापन दिन : नाटक : आहे ते आहे | लेखक : शेखर फडके |
| १८ | १८ऑक्टोबर २०१७ | दिवाळी पहाट | गायिका : पूजा गायतोंडे - मराठी, हिंदी भक्ती गीते, गझल गायन |



Ahval text18.indd 11 2/2/2019 4:43:04 PM

# कौतुक सोहळा - गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी सन्मान

महाराष्ट्र सेवा संघातर्फे मुलुंड मधील विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेली विविध पारितोषिके :

**कै. राम गणेश गडकरी पारितोषिक** : मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत उच्च मराठी विषय घेऊन मराठीत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | |
|---|---|
| कु. अमोघ कृष्णानंद पै | सौ. लक्ष्मीबाई इंग्लिश स्कूल |
| कु. शालवी सावंत | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल |

**महर्षी अण्णासाहेब कर्वे पारितोषिक** : मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कु. सानिका महेश राजदे | शेरॉन इंग्लिश हायस्कूल | ९९.६० % |

**कै. अंबादास डांगे पारितोषिक** : मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत संस्कृत या विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कु. सावरिका तिवारी एस्. | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. कुणाल के. मणियार | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु.ऋग्वेद प्रभाकर राणे | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. मानन विमल सावला | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. आयुष निलेश शाह | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. महाडेश्वर मृण्मय | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. कृष्णा दर्शन शाह | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु.सार्थ निखिल शहा | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु.मोक्ष नरेंद्र जैन | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. दीप समीर ठक्कर | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. अनुश्री सुरेश बुगडे | सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूल | १०० |
| कु. तनुश्री पार्थसारथी चक्रवर्ती | सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूल | १०० |
| कु. अवंतिका नायक | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |
| कु. रिया रेगे | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |
| कु. प्रांजल सावंत | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |

**श्री. सु.ल. गद्रे पारितोषिक** : मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील महानगर पालिकेच्या माध्यमिक मराठी विद्यालयातून सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

**कै. विठ्ठलराव व कै. सुशीला घाटणेकर पारितोषिक** : मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कु. सानिका महेश राजदे | शेरॉन इंग्लिश हायस्कूल | ९९.६० % |

**सौ सुषमा केतकर पारितोषिक :** मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कु. सानिका महेश राजदे | शेरॉन इंग्लिश हायस्कूल | ९९.६० % |



Ahval text18.indd 12 2/2/2019 4:43:04 PM

**कै. डॉ. सदाशिव अं. डांगे स्मृती पारितोषिक :** मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधील शाळांतून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यात व प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कु. सानिका महेश राजदे | शेरॉन इंग्लिश हायस्कूल | ९९.६० % |
| कु. आयुष निलेश शाह | शेठ करमजी कानजी हायस्कूल | ९९.४० % |

**कै. हरेश्वर केशव लोखंडे स्मृती पारितोषिक** : मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील माध्यमिक शाळांतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कु. श्वेता विनोद गुप्ता | म.न.पा.माधगयमिक शाळा | ८४.२०% |

**कै. मुरलीधर सुका चौधरी पारितोषिक** : मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील शाळांतून गणित विषयात उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| कु. आयुष निलेश शाह | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. नीर संजय सावला | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. रूमित हितेश संघवी | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. सोहम सावरकर | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |
| कु. अवंतिका नायक | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |

**कै.ऋषिकेश जोशी पारितोषिक :** मार्च २०१७ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत संस्कृत विषयात १०० गुण मिळविलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थिनीस :

| | | |
|---|---|---|
| कु. सावरिका तिवारी एस्. | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. कुणाल के. मणियार | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु.ऋग्वेद प्रभाकर राणे | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. मानन विमल सावला | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. आयुष निलेश शाह | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. महाडेश्वर मृण्मय | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. कृष्णा दर्शन शाह | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु.सार्थ निखिल शहा | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु.मोक्ष नरेंद्र जैन | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. दीप समीर ठक्कर | शेठ करमजी कानजी हायस्कूल | १०० |
| कु. अनुश्री सुरेश बुगडे | सेंट मेरी कॉन्वहेंट स्कूल | १०० |
| कु. तनुश्री पार्थसारथी चक्रवर्ती | सेंट मेरी कॉन्वहेंट स्कूल | १०० |
| कु. अवंतिका नायक | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |
| कु. रिया रेगे | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |
| कु. प्रांजल सावंत | व्ही.पी.एम्. बी. आर. तोल इंग्लिश हायस्कूल | १०० |



Ahval text18.indd 13 2/2/2019 4:43:04 PM

# संस्कृत विभाग

गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष) मुग्धा गोळे (कार्यवाह)
**सदस्य :** चं. ना. वझे, चं.म. कुलकर्णी, सुमेधा नवाथे,भावना दांडेकर, प्रसाद भिडे, प्रसाद गोडसे

१) प्रतिवर्षी संस्थेतर्फे 'कै. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार व 'स्व. उद्धवराव त्रिविक्रम आठले संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार' दिला जातो. या पुरस्कारांचे दि. १८ नोव्हेंबर २०१७ रोजी संस्थेच्या सु.ल.गद्रे सभागृहात अत्यंत दिमाखात वितरण झाले. या वर्षी 'कै. लाटकरशास्त्री पुरस्कार' पुणे येथील विदुषी डॉ. अंजली पर्वते यांना देण्यात आाला. तसेच संस्कृत भाषेच्या प्रसाराचे कार्य करणाऱ्या पुणे येथील डॉ. आशाताई गुर्जर व नाशिक येथील सौ. संगीता अंभोरे यांना 'स्व. उद्धवराव त्रिविक्रम आठले पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या मााजी कुलगुरू डॉ. उमा वैद्य उपस्थित होत्या. यावेळी सौ. धनश्री लेले व डॉ. प्रसाद भिडे यांनी सादर केलेले 'शाकुंतल - रसास्वाद' हे नाट्य सर्वांची दाद मिळवून गेले.
२) गेली ३३ वर्षे चालणारा संस्कृत रसास्वाद वर्ग हा तर संस्थेतर्फे अव्याहतपणे चालणाऱ्या अनेक उपक्रमांचा मुकुटमणीच. यावर्षी ४० वर्ग झाले. यामध्ये ब्रह्मसूत्रातील ५८ सूत्रे , नासदीय सूक्तातील काही ऋचा, सांख्य तत्वज्ञानातील २५ तत्वे, 'सत्संग' या विषयावर व्याख्यान , तसेच 'द्वादशपंजरिका स्तोत्र' यांचा अभ्यास करण्यात आला.
३) संस्कृत विभागाने यावर्षी ५७ व्या महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्यस्पर्धेत सादर केलेल्या पं. प्रभाकर भातखंडे लिखित 'एहि मृत्यो स्वागतं ते!' या नाटकाने द्वितीय क्रमांक पटकाविला. दुधात साखर म्हणजे, या नाटकातील एक कलाकार व संस्कृत विभागाचे कार्यवाह श्री. तक्षिल खानविलकर यांना सर्वोत्कृष्ट अभिनयाचे रौप्यपदक व श्री. आनंद केळकर यांना उत्कृष्ट प्रकाशयोजनेसाठी प्रथम पारितोषिक मिळाले.

मुग्धा गोळे (कार्यवाह) गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष)

# आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, प्र.र. दामले - कार्यवाह
सदस्य : श्री. अ. मो. भंडारे, श्री. र. द. लाड, श्री. विनायक जोगळेकर, श्री. सु. ह. बागाईतकर, श्री. प्रकाश सडेकर, श्री. वि. म. सौदागर, श्री. वि. सं. जोशी

सध्या मुलुंडकरांसाठी आरोग्य विभागाने प्रबोधनपर व्याख्यानमाला सुरू केली आहे. मानवी शरीर व होऊ शकणारे संभाव्य आजार केंद्रस्थानी ठेऊन एकेक विषय घेत त्यातील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. ज्यामुळे श्रोत्यांना मानवी अवयवांची व संभाव्य आजारांची तोंडओळख करून देण्यात येते व योग्य ते मार्गदर्शन करण्यात येते. चालू वर्षी तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता , पदाधिकाऱ्यांची उपलब्धता तसेच सुयोग्य वेळेची उपलब्धता यांमुळे आयोजनात सातत्य राखता आले नाही मात्र यावर अवश्य मात करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

दि. ३०/०७/२०१७ रोजी कोल्हापूरचे आयुर्वेदाचार्य सुनील पाटील यांचे ''आयुर्वेद - एक उपचार पद्धती'' या विषयावर व्याख्यान आयोजण्यात आले होते. आयुर्वेद म्हणजे काय ? स्वास्थ्य कशाला म्हणावे ? आयुर्वेद व मनाचा संबंध , पंचकर्म, आहार इ. विषयांवर उहापोह करीत त्यांनी आपले व्याख्यान रंगविले. दि. ३१/०१/२०१८ रोजी डॉ. शिल्पा देशपांडे व डॉ. गौरी विडोलकर या पॅथॉलॉजिस्ट भगिनींचे संयुक्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. देशपांडे यांनी वेगवेगळ्या आजारांशी संबंधित विविध रक्त तपासण्या तर



Ahval text18.indd 14 2/2/2019 4:43:04 PM

डॉ. विडोलकर यांनी कर्करोगाशी संबंधित रक्त तपासण्या यावर सादरीकरणासह माहिती दिली. दोघींनी अशा तपासण्यांद्वारे ''वेळीच रोग-निदान म्हणजे मुक्तीकडे वाटचाल'' हा एक मंत्र उपस्थित श्रोत्यांना व्याख्यानाच्या शेवटी दिला.

बॉम्बे हॉस्पिटलच्या सहकार्याने मॉडेल टाऊन येथे चालविण्यात येत असलेल्या दवाखान्याचे नूतनीकरण पूर्ण झाले असून त्याद्वारे रूग्णांसाठी प्रसन्न वातावरणनिर्मिती करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याच दवाखान्यात चालविण्यात येत असलेले भौतिक उपचाार केंद्र दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत असल्याचे दिसते. आसपासच्या परिसरातील लोकांचा सहभाग ही वाढतच असल्याचे अनुभवास येते. चालू वर्षी एकंदर २३३९ म्हणजेच दरमहा सरासरी २०० रूग्णांनी भौतिक उपचार केंद्रास भेट देऊन तेथील सेवेचा लाभ घेतला. या वर्षीच्या सुरूवातीस काही वेळा दरमहा लाभार्थींची संख्या ३०० पार गेली आहे. या भौतिक उपचार केंद्रात यंदा अवघडलेल्या स्नायूंवर उपचार करण्यासाठी नवीन आय.एफ.टी. मशीन ही घेण्यात आले आहे व त्याचे परिणाम ही चांगले आढळून आले आहेत. इतर आजारांवरील औषधोपचारासाठी वर्षभरात दवाखान्याचा लाभ घेण्याऱ्या रूग्णांची संख्या ३२८८ आहे. औषधोपचार तथा भौतिक उपचारासाठीचे आकारले जाणारे दर आसपासच्या परिसरातील लोकवस्ती डोळ्यासमोर ठेऊन अत्यंत माफक वाजवी ठेवण्यात आलेले आहेत. महापालिकेच्या रूग्णालयातून जवळपासच्या परिसरातील क्षयरोगाने बाधित झालेले रूग्ण सोयीसाठी कालबद्ध उपचार सुविधेसाठी या दवाखान्यात पाठविण्याची परंपरा पाळली जात आहे.

प्र. र. दामले , कार्यवाह                                                    र.दे धामणकर, अध्यक्ष

## आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - सुषमा पाटणकर, संपादन साहाय्य : दत्तात्रय व. कुलकर्णी, विनोद सौदागर, रवींद्र लाड, नंदिनी हंबर्डे , अरुण भंडारे.

'आपुलकी' या त्रैमासिक मुखपत्राची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. या अहवाल वर्षात दिवाळी अंकासहित तसेच सहस्त्रचंद्रदर्शन विशेषांकासहित चारही आवृत्यांमध्ये विविध विषयांवरील लेख, मुलुंड वा मुलुंड परिसरातील यशस्वी व्यक्तींचे परिचय, आरोग्य, संगीत, भाषा, नाट्य, सामाजिक समस्या इ. विषयांवरील सकस लेख प्रसिद्ध झाले; थोडक्यात सांगायचे झाल्यास 'आपुलकी'च्या धोरणास अनुसरून सकारात्मक, विधायक, व प्रेरक अशा विषयांवरील साहित्य प्रसिद्ध करण्यात आले. उपक्रमाला वाचकांचा चांगला प्रतिसाद लाभतो आहे.

सुषमा पाटणकर,
कार्यकारी संपादक, आपुलकी



Ahval text18.indd 15 2/2/2019 4:43:04 PM

# मैत्रेयी- महिला विभाग

मैत्रेयी - महिला विभाग, मुलुंड
माधवी भुसारी (अध्यक्ष), प्रियांका मोकाशी (कार्यवाह)
सदस्य : सुषमा पाटणकर, सुनीता देवधर, इंदिरा कुलकर्णी, वासंती वैद्य, नंदिनी हंबर्डे, रश्मी अनगळ, वीणा नाटेकर, मेधा देव

मैत्रिणींच्या जाणीवा प्रगल्भ करण्याचं काम मैत्रेयी गेली ३१ वर्षे सातत्याने करीत आहे. महिलांना व्यक्त होण्यासाठी प्रोत्साहन देणं, त्यांच्या कलागुणांना वाव देणं हे मैत्रेयीचं प्रमुख उद्दिष्ट. दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी अक्षरमैत्री या उपक्रमांतर्गत विविध विषयांवर व्याख्याने, अनुभवकथन, साहित्यविषयक कार्यक्रम, लेखिकांशी सुसंवाद, एखाद्या विषयावर आपले विचार मांडण्याची संधी देणारा मुक्तसंवाद, यासारखे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. अहवाल वर्षाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे होते.

मंगळवार दि. ६ जून १७: रश्मी अनगळ व सुहास कराडकर यांनी अंबरीश मिश्र यांनी अनुवादित केलेल्या गुलजार यांच्या ‘देवडी’ या कथासंग्रहातील कथांचे अभिवाचन केले.

मंगळवार दि. २० जून १७ : जीवन करी जीवित्वा, अन्न हे पूर्णब्रह्म या दृकश्राव्य कार्यक्रमात दिप्ती सौदागर यांनी अन्नघटकांविषयी उपयुक्त माहिती दिली.

मंगळवार दि. ४ जुलै १७: आठवणींचा काव्यप्रवास या कार्यक्रमांतर्गत वर्षा मंत्रवादी यांनी आपली आजी सरोजिनी ताम्हाणे यांच्या कवितांमागील आठवणी उलगडून दाखवल्या.

मंगळवार दि. १८ जुलै १७: गच्चीवरचा बगिचा या कार्यक्रमांतर्गत मैत्रेयी केळकर यांनी गच्चीवर लावण्याजोगी झाडे व त्यांची निगा याविषयी दृकश्राव्य माध्यमातून उपयुक्त मार्गदर्शन केले.

मंगळवार दि. १ ऑगस्ट१७ : मैत्री दिनानिमित्त मैत्री अशी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये स्वप्ना पटवर्धन व मधुरा महंत यांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या मैत्रीविषयी विवेचन केले.

मंगळवार दि. २२ ऑगस्ट १७ : ‘शूरा मी वंदिले’ या कार्यक्रमात कर्नल श्रीरंग खरे यांच्या पत्नी व लेफ्टनंट सागर खरे यांची आई शिल्पा खरे यांनी सैनिक पत्नीच्या आयुष्यातील आव्हानांविषयी तसेच एकंदर सैनिकी जीवनाविषयी अनुभव कथन केले.

मंगळवार दि. १९ सप्टेंबर १७: मुक्तसंवाद या कार्यक्रमात पुढील विषयांवर उपस्थित मैत्रिणींनी आपले विचार मांडले. विषय १) नोटाबंदी आणि मी २) गणपती उत्सवात भक्ती उरली आहे का ?३) व्हॉट्सॲप चा अतिरेक ४) आता माझी सटकली

शनिवार दि. २३ सप्टेंबर १७: मुलुंडमधील सर्व महिला मंडळाच्या सहभागाने ५४वा शारदोत्सव उत्साहात पार पडला. त्यानिमित्ताने दोन कार्यक्रम आयोजित केले होते. १) स्त्रीची विविध रूपे हा लोकप्रिय नाटकांवरील आधारित कार्यक्रम माधवी पाठारे यांनी सादर केला. २) ‘लावण्य कवितेचे’ या कार्यक्रमात दिपाली केळकर यांनी विविध कवितांमधील सौंदर्य उलगडून दाखविले. सहभागी महिला मंडळे : १) मैत्रेयी २) कल्पना विहार महिला मंडळ ३) राष्ट्र सेविका समिती ४) चित्तपावन ब्राह्मण महिला मंडळ ५) देशस्त ऋग्वेदी ब्राह्मण महिला मंडळ ६) रूद्राणी पुरोहिता मंडळ

मंगळवार दि. ३ ऑक्टोबर १७: कोजागिरीनिमित्त ‘चांदणवेल’ या कार्यक्रमात मुलुंडमधील हौशी गायककलाकारांनी चंद्र-चांदण्या या संकल्पनेवर आधारित गाणी सादर केली, त्यानंतर आयोजित केलेल्या दांडियामध्ये उपस्थित मैत्रिणी उत्साहाने सहभागी झाल्या.

मंगळवार दि. ७ नोव्हेंबर १७: ‘बोलू ऐसे बोल’ या कार्यक्रमात अनघा मोडक या तरूण व दृष्टीबाधित मैत्रिणीने संवादकौशल्याविषयी अतिशय उपयुक्त मार्गदर्शन केले. साधना काकतकर यांनी उत्तम प्रकारे संगीत साथ दिली.

मंगळवार दि. २१ नोव्हेंबर १७: ‘पेशवाईतील दागिने’ याविषयी डॉ. वर्षा शिरगांवकर यांनी चित्रफीतीच्या माध्यमातून मनोरंजक माहिती दिली.

मंगळवार दि. १९ डिसेंबर१७ : ‘तिरकिट धा - तालरंग’ या कार्यक्रमात पं. भाई गायतोंडे यांच्या शिष्या शुभदा कुलकर्णी -कुर्वे यांनी एकल तबलावादन सादर केले. त्यांना स्मिता मनोहर यांनी संवादिनीवर उत्तम साथ दिली.

मंगळवार दि. २ जानेवारी १८: अ-अभिनयाचा,अ-अध्यापनाचा हा नाट्यप्रवेशांचे सादरीकरण व अभिनयाची अध्यापनाशी सांगड घालणारा कार्यक्रम ज्येष्ठ अभिनेत्री रजनी वेलणकर यांनी सादर केला.

रविवार दि. ७ जानेवारी १८: मैत्रेयीचे ३१वे स्नेहसंमेलन यशस्वीरित्या संपन्न झाले. यावर्षीचा कै. सौ. प्रभावतीबाई पागे पुरस्कार ज्येष्ठ



Ahval text18.indd 16 2/2/2019 4:43:04 PM

अभिनेत्री स्वाती बोवलेकर यांना सुप्रसिद्ध अभिनेत्री सीमा देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. वीणा नाटेकर यांनी स्वातीताईंशी मनमोकळा संवाद साधला. त्यानंतर आवाजातील वैविध्याने आवाजाच्या दुनियेवर राज्य करणाऱ्या डबिंग आर्टिस्ट मेघना एरंडे-जोशी यांच्याशी मुलुंडमधील डबिंग आर्टिस्ट युगंधरा वळसंगकर यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या. स्नेहभोजनानंतर विविधरंगी अशा कमळाच्या फुलाची, शब्द-सूर-नृत्याच्या मिलापातून उलगडण्यात आलेली अनोखी गाथा पद्मिनी सादर करण्यात आली. डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी यांचे निवेदन व नुपुर दैठणकर आणि सहकलाकारांनी सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढली.

मंगळवार दि. १६ जानेवारी १८ : मुक्तसंवाद या कार्यक्रमात पुढील विषयांवर उपस्थित मैत्रिणींनी आपले विचार मांडले. विषय होते १) फिटनेसचा बिझिनेस २) ..आणि मला हुरहुर लागली ३) नाती मनातली-नाती जनातली

मंगळवार दि. ६ फेब्रुवारी १८: डॉ. अविता कुलकर्णी यांनी 'श्री संत रामदास-मॅनेजमेंट गुरू' या दृकश्राव्य कार्यक्रमातून सुमारे ४०० वर्षांपूर्वी मानवी जीवनाचे व्यवस्थापन कौशल्याविषयी उत्तम विवेचन केले.

मंगळवार दि. २० फेब्रुवारी १८: लोकप्रिय लेखिका स्नेहलता दसनूरकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कथाकथन स्पर्धा आयोजित केली होती. मैत्रेयीच्या माजी अध्यक्ष सुषमा केतकर व समिती सदस्य नंदिनी हंबर्डे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

मंगळवार दि. ६ मार्च १८: आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित आगीशी झुंजताना या कार्यक्रमात, पहिल्या महिला अग्निशमन अभियंता हर्षिणी कान्हेकर यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. मैत्रेयीच्या समिती सदस्या मेधा देव यांनी त्यांच्याशी संवाद साधला. अग्निशमन क्षेत्रातील आव्हानांविषयी तसेच अग्नीसुरक्षेविषयी त्यांनी उपयुक्त माहिती सांगितली.

मंगळवार दि. २० मार्च १८: कॉर्पोरेट क्षेत्रातील स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणारा पंचकन्या कॉर्पोरेट स्त्रिया हा कार्यक्रम मुलुंडमधील 'ज्ञानेश्वरी' ग्रुपने सादर केला. या कार्यक्रमात अरूंधती भट्टाचार्य , किरण मुजुमदार-शॉ, किर्तीगा रेड्डी, शाहीन मिस्त्री, निरूपा रॉय या महिलांच्या कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्तृत्वाविषयी रोचक माहिती मिळाली.

मंगळवार दि. ३ एप्रिल १८: 'साहित्य सुधा' हा मुलुंडमधील वीणाताई खोपकर यांच्या स्वलिखित कथांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रज्ञा गोखले व शैला चित्रे यांनी ओघवत्या शैलीत अभिवाचन सादर केले.

मंगळवार दि. १७ एप्रिल १८: वासंतिक मेळावा आयोजित केला होता. यामध्ये दोन कार्यक्रम सादर केले गेले. १) 'विंदादर्शन' या कार्यक्रमात ज्ञानपीठ सन्मानप्राप्त विंदा करंदीकर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे, वाङ्मयाचे आणि जीवनविषयक दृष्टिकोनाचे काही पैलू , त्यांच्या कन्या जयश्री काळे यांनी कविता सादरीकरणातून उलगडून दाखविले. २) बाउलगान - एक अंतर्मुख करणारी 'स्वरयात्रा' या कार्यक्रमात बंगाल प्रांतातील संत रचनांवर आधारित गायन, वादन, व नृत्यासहित निरूपणाचा समावेश असणारा हा कार्यक्रम सादर केला डॉ. उत्तरा चौसाळकर यांनी.

प्रियांका मोकाशी (कार्यवाह) माधवी भुसारी (अध्यक्ष)

**सुविधा शंकर गोखले स्मृतीदिन**

११ जून २०१७ रोजी नुपूर गाडगीळ या तरुण गायिकेचा शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

**सु. ल. गद्रे स्मृतीदिन :**

या स्मृतीदिनानिमित्त 'पंचतुंड नररुंड मालधर' हा एक वेगळ्या धर्तीचा नाट्यसंगीताचा कार्यक्रम सादर करण्यात आला. जुनी नाट्यगीते, शास्त्रीय संगीतावर आधारलेली असायची. त्यांची भाषा प्रौढ, पंडिती थाटाची, शब्द क्लिष्ट. त्याचा अन्वय लावून, अर्थ समजून घ्यायला विशेष प्रयास पडायचा. अशा नाट्यगीतांचा नेमका अर्थ, गाण्याची पार्श्वभूमी समजून घेऊन ती सादर करण्यात आली. या कार्यक्रमाचे अर्थपूर्ण निवेदन श्री. चंद्रशेखर वझे यांनी केले तसेच गाणी सादर केली होती अर्चना कान्हेरे व पं. प्रदीप नाटेकर यांनी. या कार्यक्रमासाठी ऑर्गन साथ मकरंद कुंडले व तबला साथ धनंजय पुराणिक यांनी केली. या कार्यक्रमाला रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.



Ahval text18.indd 17 2/2/2019 4:43:04 PM



# कला विभाग

अ.मो.भंडारे - (अध्यक्ष), वि.म.सौदागर (कार्यवाह)
सदस्य - चं.म. कुलकर्णी, प्रदीप नाटेकर, द.व. कुलकर्णी, र. द. लाड , स. श्री. पाटणकर, प्रकाश सडेकर, मेधा दिवेकर, मुग्धा गोळे, श्रेयसी वझे-मंत्रवादी. सुषमा पाटणकर

संस्थेचे अध्यक्ष , कोषाध्यक्ष, विश्वस्त यांनी वारंवार कार्यक्रमांची संख्या कमी करण्याबद्दल व त्याअनुषंगाने खर्चात कपात करण्याबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून सलग दुसऱ्या वर्षी कला विभागाने कटाक्षाने कार्यक्रमांची संख्या मोजकीच ठेवली मात्र दर्जा , उद्देश यांत कोणतीही तडजोड स्वीकारली नाही. खालील कार्यक्रमांची यादी पाहिल्यावर या प्रयत्नांची प्रचिती यावी.

८ एप्रिल ते १६ एप्रिल २०१७ ''बालनाट्य व्यक्तिमत्व विकास शिबिर''
मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांचे व्यक्तिमत्व विकसित व्हावे , सुसंपन्न व्हावे यासाठी नाट्यप्रशिक्षणाचा उपयोग होतो आणि म्हणून आम्ही 'बालनाट्यातून व्यक्तिमत्त्व शिबिर' आयोजित केले होते. डॉ. मनीषा बर्वे, मुग्धा गोळे, मेधा देव यांनी मुलांना मार्गदर्शन केले. शिबिराला मुलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

१ जुलै २०१७ - ''एक कलाकार एक संध्याकाळ'' : डॉ. मा.गो. खांडेकर, कुटुंबीय पुरस्कृत पुरस्कार दूरदर्शनचे माजी संचालक, निर्माते दिग्दर्शक, अभिनेते डॉ. याकूब सईद यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष , अभिनेते श्री. जयंत सावरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात करण्यात आला. मनोगतात डॉ. याकूब सईद यांनी त्यांचा जीवनपट, वाटचाल रसिकांसमोर खुल्या दिलाने पेश केली व त्याला सामोरे जाताना उपस्थित रसिक कांही काळ भावनाविवश झाले. डॉ. सईद यांच्या प्रभावी निवेदन शैलीमुळे कार्यक्रम उतरोत्तर रंगत गेला.

२२जुलै २०१७ '' वारी पंढरीची'' -प्रतीवर्षीप्रमाणे वारीचा कार्यक्रम , रिंगण, पालखी, प्रसाद इत्यादीसह आयोजित करण्यात आला व त्याला जोड 'पद्मिनी भजनीमंडळ, कल्याण' यांच्या संतरचनांवर आधारित भक्तिगीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता. आसपासच्या परिसरातील श्रद्धावान लोक मोठ्या संख्येने दरवर्षी या वारीत सहभागी होऊन वातावरण विठ्ठलमय होते.

१९ जुलै २०१७ ''स्वर आले दुरूनी'' - मुलुंडकर असलेले श्री. अभिजित खोपकर यांच्या वाद्य संगीताचा चित्रपट गीतांवर आधारित कार्यक्रम आयोजिला होता. एकच व्यक्ति वेगवेगळी अनेक वाद्ये किती सफाईदारपणे हाताळू शकते याचे प्रात्यक्षिक रसिकांना पाहायला मिळाले.

१९ ऑगस्ट २०१७ ''प्लॅस्टिक मुक्त मुलुंड'' - सादरकर्त्या - अस्मिता गोखले - निर्भया ग्रुप

८,९ व १० सप्टेंबर २०१७ ''के. लक्ष्मणराव महाबळ पितृस्मृती व्याख्यानमाला''
१)डॉ. डी.एस.पाटील - रयत शिक्षण संस्था
२)डॉ. प्रशांत देशमुख - हैदराबाद मुक्तिसंग्राम
३) रवींद्र लाड - ईस्ट इंडिया कंपनी आणि महाराष्ट्र
व्याख्यानासाठी निवडलेले विषय व व्याख्याने यामुळे ही व्याख्यानमाला उद्बोधक ठरली.

१६ सप्टेंबर २०१७ ''भूलाए न बने '' - संगीतकार मी रामचंद्र यांच्या सांगीतिक कारकिर्दीचा आढावा घेणारा दृकश्राव्य कार्यक्रम. सादरकर्ते - डॉ. सुरेश चांदवणकर, भालचंद्र मेहेर. डॉ. चांदवणकर आपला सादरीकरणाच्या माध्यमातून उपस्थित रसिकांना जुन्या जमान्यात घेऊन गेले व रसिक प्रेक्षकही त्यात गुंगून गेले.

१७ सप्टेंबर २०१७ ''मन एक नि:शब्द साद'' - गुरू शिष्य परंपरेवरील नृत्याचा कार्यक्रम सौ. मेधा दिवेकर यांनी 'सरस्वती नृत्य कलामंदिर'च्या माध्यमातून सादर केला. कार्यक्रमातील पेशकश, प्रकाशयोजना, अभिनय यााबाबतीत रसिकांची दाद मिळवून गेलेला कार्यक्रम झाला.

१८ ऑक्टोबर २०१७ ''दिवाळी पहाट'' - उदयोन्मुख गायिका पूजा गायतोंडे हिच्या हिंदी मराठी भजन भक्तिगीत, गझल-गायन अगदी लहान वयात आपल्या आवाजाने व सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकणारी गायिका व तिची उत्तम पेशकश यामुळे कार्यक्रम उत्तम रंगला.


४ व ५ नोव्हेंबर २०१७ ''छंद माझा वेगळा'' - छंदिष्टांच्या छंदकृतींचे आगळे वेगळे प्रदर्शन सुमारे ३५ छंदिष्टांनी आपापल्या छंदकृती



Ahval text18.indd 18 2/2/2019 4:43:04 PM

यांत सादर केल्या. अशा प्रकारचे प्रदर्शन मुंबईला पूर्व उपनगरात इतक्या मोठ्या प्रमाणात प्रथमच आयोजित केले गेले व त्यामुळे हे प्रदर्शन अलोट गर्दीत पार पडले. दोन दिवसांच्या मुदतीत सुमारे १०००० लहान थोरांनी या प्रदर्शनाला भेट दिली. हे प्रदर्शन पाहून कित्येकांना नव्याने कळले की असेही काही छंद असतात.

विनोद सौदागर, कार्यवाह अरुण भंडारे, अध्यक्ष



## संगीत महोत्सव

संस्थेच्या वतीने आत्तापर्यंत सहा 'स्वरझंकार महोत्सव 'आजवर संपन्न झाले होते. अभिजनांचा उत्तम प्रतिसाद लाभल्यामुळे यंदाही ७ वा 'संगीत महोत्सव' साजरा झाला. कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे:

रविवार २१ जानेवारी २०१८ : शास्त्रीय संगीतप्रेमींसाठी एका संगीत मैफिलीचे आयोजन केले होते. या मैफिलीचे वैशिष्ट्य म्हणजे ही वादक व गायकांची मैफिल होती. बासरीवादक श्री. आनंद काशीकर आणि गायक पं. कैवल्यकुमार यांनी मैफिलीत रंग भरला. या कार्यक्रमासाठी कै. अशोक सहस्त्रबुद्धे यांच्या कुटुंबियांचा आर्थिक सहभाग होता.

## महाराष्ट्रातील गिर्यारोहकांचे १६ वे गिरिमित्र संमेलन



गेल्या वर्षीपासून गिरिमित्र विभाग आता स्वतंत्रपणे वाटचाल करू लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. ८ व ९ जुलै २०१७ रोजी गिरिमित्र संमेलनाची कार्यक्रम पार पडला. या सोहळ्यास भारतातून आणि महाराष्ट्रातून डोंगर भटक्यांनी , गिर्यारोहकांनी , हजेरी लावली होती.

यंदाच्या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना ''साहसाची परिसीमा'' अशी होती. गिर्यारोहण आणि इतर साहसी खेळात आपल्या साहसाची परिसीमा गाठलेल्या व्यक्तींच्या कार्याचा आढावा आणि सन्मान करण्यात आला.

या संमेलनासाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या महिला गिर्यारोहक गेरलिन्ड कल्टेनब्रुनर या युरोपच्या ऑस्ट्रीया/व्हिएन्ना देशातून विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहिल्या. यांच्याबरोबर शिडाच्या होडीने जगप्रदक्षिणा पूर्ण करणारे कमांडर अभिलाष टॉमी (शिडाच्या होडीने कोठेही न थांबता ही प्रदक्षिणा पूर्ण करणारे ते पहिले भारतीय आहेत.) हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहिले.

साहसाची परिसीमा गाठणाऱ्या श्रीमती गेरलिन्ड कल्टेनब्रुनर यांनी ८ हजार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या जगभरातील सर्वच्या सर्व १४ हिम शिखरांवर यशस्वी आरोहण केलेले आहे. त्यात चिली देश अलास्का, चायना, नेपाळ, तिबेट, भारत, पाकिस्तान इ. देशांचा समावेश आहे. महत्त्वाचे म्हणजे कृत्रिम प्राणवायूचा वापर न करता, तसेच उंचीवर सामान वाहून नेण्यासाठी गरजेचे असणारे भारवाहकांचे (शेर्पा) साहाय्य न घेता हे आरोहण यशस्वी करणाऱ्या त्या जगातील पहिल्या महिला आहेत. संमेलनात त्यांनी त्यांच्या मोहिमांचे, सादरीकरण केले तेव्हा गिर्यारोहकांनी सभागृह डोक्यावर घेतले. महारष्ट्र सेवा संघाचा ''अतुल्य गिरिमित्र'' जीवन गौरव पुरस्कार, संमेलनाचे मुख्य अतिथी मा. न्यायमूर्ती अभय ओक, मुंबई उच्च न्यायालय यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी गेरलिन्ड कल्टेनब्रुनरची मुलाखत ख्यातनाम गिर्यारोहक श्री. हरीष कपाडिया यांनी घेतली. भारतातील दिग्गज साहसवीर कमांडर अभिलाष टॉमी , आणि लेफ्टनंट कर्नल डॉ. श्रीनिवास गोकुळनाथ यांचाही सन्मान प्रशस्ती पत्रे आणि स्मृतीचचिन्हे देऊन गौरव करण्यात आला. संमेलनात त्यांनीही आपले अनुभव आणि दृकश्राव्य चित्रफीती सादर केल्या.

या परमोच्च सन्मान सोहळ्यासोबतच महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची माहिती , संवर्धन करण्याबाबत महाराष्ट्र शाससनाचे काय उपक्रम आणि उपाय आहेत त्याबाबतचे प्रत्यक्ष सादरीकरण करून डॉ. तेजस गर्गे संचालक पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालयाचे प्रमुख म्हणून हजेरी लावली. १६ वे गिरिमित्र संमेलनाचे ''संमेलन प्रमुख'' म्हणून यूथ हॉस्टेल मुंबई विभागाचे श्री.मुकेश मैसेरी यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

दरवर्षीच्या संमेलनात घेण्यात येणारे कार्यक्रमही सादर झाले. त्यात
गिरिमित्र जीवन गौरव सन्मान - गिर्यारोहक हिरा पंडित
गिरिमित्र गिर्यारोहक सन्माान - गिर्यारोहक दिव्येश मुनी आणि अशोक पवार-पाटील
गिरिमित्र संस्थापक कार्यसन्मान - राजेंद्र फडके, माधव फडके, भगवान चिले
गिरिमित्र संस्था सन्मान - गिरिविहार (मुंबई) आणि रत्नागिरी गडकोट प्रतिष्ठान खेड
गिरिमित्र शरद ओवळेकर सन्मान - रानवाटा - ठाणे
यांना प्रदान करण्यात आला.

दरवर्षी गिरिमित्रांसाठी वेगवेगळ्या उपक्रमांची स्पर्धा घेण्यात येते. यात महाराष्ट्रातील अनेक संस्था सहभागी होऊन सादरीकरण करतात. त्यांची निवड आणि स्पर्धांत जिंकणाऱ्याना प्रशस्तिपत्रक , स्मृतीचिन्हे आणि आर्थिक मदत केली जाते.

**यंदाच्या दृकश्राव्य सादरीकरण स्पर्धेत :-**

प्रथम क्रमांक - चेतना रेमिनिस - निसर्ग मित्र पनवेल आणि गिर्यारोहक - डोंबिवली
द्वितीय क्रमांक - बावली बूच
तृतीय क्रमांक - केराटोकोनस फाऊंडेशन , इंडिया, सांगली
उत्तेजनार्थ - आऊटसाईड द लायब्रिंन्थ याना मिळाली.

**छायाचित्रण स्पर्धा - माऊंटेन लॅन्डस्केप**

प्रथम क्रमांक - इंद्रवज्र , राजगड - श्रीकांत शिंपी
द्वितीय क्रमांक - दि सायलेन्ट माऊंटन - दिपक बारटक्के
तृतीय क्रमांक -द रोड लेस ट्रॅव्हल्ड - लांग्झा स्पिती - मेधा जैन
उत्तेजनार्थ - द ग्लिटरिंग सह्याद्री - अनिकेत कस्तुरे
विभागुन उत्तेजनार्थ - गगनभेदी तुला देत अव्हान - नितेश जाधव

**पोस्टर स्पर्धा -**

प्रथम क्रमांक - भिंताड्यांची कला इतिहासाला घोर - अजेय हातेकर
द्वितीय क्रमांक - या शेंदुराखाली दडलंय काय ? - खेमचंद खैरनार
उत्तेजनार्थ - देवगिरीचे नागबंध - प्रशांत परदेशी

**ट्रेकर ब्लॉगर स्पर्धा**

प्रथन क्रमांक - दुर्गवेध महराष्ट्रातील गडकोटांचा - विनित वि. दाते
द्वितीय क्रमांक - महाराष्ट्र देशा - पंकज समेळ
तृतीय क्रमांक - उनाड भटकंती - देवा घाणेकर

सह्याद्रिच्या डोंगररांगांतील घाटमाथ्यावरील भटकंती हा ''वॉकींग ऑन द एज'' हा विशेष सादरीकरणाचा भाग श्री. प्रसाद निकते या डोंगरभटकंती करणाऱ्या गिर्यारोहकांनी सादर केला. दरवर्षीप्रमाणे गिर्यारोहकांचा सागर या संमेलमास उसळला होता. नेहमीप्रमाणे महाराष्ट्र सेवा संघाच्या गिरिमित्र विभागातील प्रसाद जोशी, अपर्णा भट्टे, प्रीति पटेल, दिपाली भोसले, प्रकाश वाळवेकर, अशोक पाटील, माधव फडके, रवी परांजपे, मिलिंद जोशी, रमेश कुलकर्णी, सुहास जोशी, किरण देशमुख, राजस देशपांडे, राहुल मेश्राम, मंदार कर्वे, राजन बागवे, धनंजय मदन, पल्लवी वर्तक, अभिजित रणदिवे, प्रणोती जोशी, नरेंद्र सकपाळ, मेधा वेलणकर, अथर्व जोशी, सुरेंद्र मसुरकर, मंगेश चौधरी, श्रीधर दळवी, जीतेंद्र अष्टेकर, कौस्तुभ सामंत, धनंजय देव कार्यकर्त्यांनी हे संमेलन यशस्वीपणे पार करून दाखविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी आमडेकर , वैशाली देशमुख व स्वप्नाली धाबुगडे यांनी केले होते.

| कार्यवाह | समन्वयक | समन्वयक | समन्वयक | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| किरण देशमुख | अरूण भंडारे | रवींद्र लाड | विनोद सौदागर | ह्रषिकेश यादव |

# प्रेरणा पुरस्कार' व 'सॅल्यूट इंडिया'



हा स्वतंत्र विभाग नसल्यामुळे उपक्रमाचा समन्वय ह्या भूमिकेतून हा अहवाल देत आहे.

अतिशय वेगळ्या संकल्पनेतून विकसित होत गेलेल्या 'सॅल्युट इंडिया' ह्या उपक्रमाने आपल्या तिसऱ्याच वर्षी अभूतपूर्व गगनभरारी घेतली ती 'वायुशक्ती' ह्या भारतीय हवाई दलाच्या भव्य प्रदर्शनाद्वारे! ''भारताच्या नौदलाचे सामर्थ्य'' ह्या आदल्याच वर्षी आयोजिलेल्या प्रदर्शनाच्या यशातून प्रेरणा घेऊन घाट घातलेल्या ह्या कार्यक्रमाचं वेगळेपण मुद्दाम नमूद करावे असे आहे. संस्थेने कदाचित प्रथमच एवढ्या मोठ्या स्वरूपातला संस्थेचा कार्यक्रम संस्थेच्या वास्तूबाहेर आयोजित केला. ह्याला निमित्त झाले प्रदर्शनाच्या पसाऱ्यासाठी मैदानासकट मोठ्या जागेच्या आवश्यकतेचे. अनेक सव्यापसव्यानंतर अखेर संपूर्ण प्रदर्शन 'रावसाहेब बाळाराम ज्ञानदेव ठाकूर विद्यांमदिर' ह्या संस्थेच्या इमारतीत व मैदानात प्रचंड तयारीनिशी साकार झाले. ह्या संस्थेनेही कार्यक्रमस्थळाविषयी संपूर्ण सहकार्य केले आणि कुठेही कसर पडू दिली नाही.''मेरीटाईम्स एअर ऑपरेशन्स''(एम्.ए.ओ.) ह्या भारतीय हवाई दलाच्या मुंबईतील कार्यालयाने प्रदर्शनाचे सर्व व्यवस्थापन उत्तमरित्या आपल्या संस्थेच्या माध्यमातून करून दिले. हवाई दलाचे निकष प्रत्येक बाबतीत त्यांच्या सूचनांनुसार पाळण्यासाठी संस्थेने आर्थिक, श्रमिक आणि नैतिक अशी सर्व जबाबदारी अतिशय निगुतीने पेलली. संस्थेचे सर्व कार्यकर्ते, शुभेच्छुक आणि हाकेला धावून येणारे व्यावसायिक अशा सर्वांनीच विश्वस्त आणि कार्मचारी समितीने आम्हा सर्वांवर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी अतोनात परिश्रम घेतले. प्रदर्शन भव्य आणि देखणे तर झालेच पण हवाई दलाच्या (एम्.ए.ओ.) च्या प्रमुख फर्नांडीस साहेबांनी (ए.व्ही.एम्.) उत्तम आयोजनाकरता संस्थेचे भरभरून कौतुक केले व तसे लेखी प्रशस्ती पत्रकही दिले. निवृत्त एअर मार्शल अरूण गरूड ह्यांनी त्यांच्या भाषणात आपल्या ४० वर्षांच्या सेवेत हवाई दलाचे इतके उत्तम प्रदर्शन एका सामाजिक संस्थेने आयोजित केल्याचे बघितले नसल्याचे सांगुन संस्थेला जी दाद दिली ती निः संशय संस्थेला मिळालेली सर्वात अभिमानास्पद अशी पावती होती.

तीन दिवस चाललेल्या ह्या प्रदर्शनाला एकूण १३,००० व्यक्तींनी उपस्थिती लावली. त्यापैकी सुमारे ५,००० विविध शाखांचे विद्यार्थी होते. अभूतपूर्व गर्दीत घडून आलेल्या ह्या प्रदर्शनात कुठलीही किरकोळदेखील दुर्घटना न घडता अत्यंत सुसूत्रपणे संपूर्ण कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला. त्याचे श्रेय स्थानिक पोलिस यंत्रणा, अग्नीशमन दल, ह्यांच्याबरोबरच कार्यक्रमातील ५० ते ६० स्वयंसेवक आणि अतिशय सुजाण नागरिक असे सर्वांनाच संस्थेच्या वतीने देणे मला योग्य वाटते. प्रदर्शनात हवाईदलाची विविध मॉडेल्स, आयुधे, यंत्रणा इत्यादी तर होतेच पण अतिशय रोचक अशी ड्रोनची प्रात्यक्षिके, अनेक चित्रफिती, मान्यवर तज्ज्ञांची व्याख्याने, 'सॅल्यूट'च्या कार्यकर्त्यांनी बनवलेले माहितीपूर्ण फलक, हवाई दलाचे करिअर मार्गदर्शन दालन अशी विविधांगी आणि भरगच्च योजना होती आणि त्याला उपस्थितांनी अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. त्या भव्य सोहळ्याची सांगता खास गुजरातमधून पाचारण केलेल्या हवाई दलाच्या बँडपथकाच्या जोरकस सादरीकरणाने अतिशय समर्पकरित्या करण्यात आली.

हवाईदलाचे प्रदर्शन हे दीर्घ तयारीचे फलित होते. मात्र विज्ञान विभागाचे आणि सॅल्यूटचे कार्यकर्ते त्याचमुळे या वर्षी इतर कार्यक्रम फारसे राबवू शकले नाहीत. सॅल्यूटचा दुसरा अभिमानास्पद कार्यक्रम म्हणजे 'प्रेरणा पुरस्कार'. यंदा या पुरस्काराचे मूळ प्रायोजक ''वैद्य पाटणकर फार्मसी'' चे श्री. पाटणकर ह्यांनी आर्थिक मर्यादा सूचित केल्यामुळे नेहमीचा ३ व्यक्तींना पुरस्कार देण्याचा शिरस्ता बाजूला ठेवून थोडा बदल करण्याचा संस्थेने विचार केला आणि विशेष म्हणजे ह्या गोष्टीस अनुकूल आणि समर्पक अशी संधी सॅल्यूटला मिळाली. पुरस्कारासाठी उचित व्यक्तीचा शोध घेण्याच्या निमित्ताने सॅल्यूटच्या काही कार्यत्यांनी माार्गदर्शक व विंगकमांडर (निवृत्त) श्री. कोपीकर ह्यांच्या मदतीने खडकी येथील 'पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर' ह्या संस्थेला भेट दिली. आपले कर्तव्य बजावत असताना मेरूदंडाला दुखापत झाल्याने कमरेखालचे अथवा संपूर्णच शरीर कायमचे संवेदनहिन झालेल्या सैनिकांना (तिन्ही दलांच्या) पुनर्स्थापित करण्याचे अतिशय मोलाचे कार्य सदर संस्था करते. प्रत्यक्ष भेटीत तिथे चाललेले हे आगळेवेगळे काम बघून कार्यकर्ते खूपच प्रभावित झाले. ही संस्था जरी संरक्षण विभागानेच सुरू केली असली तरी आपल्या दर्जेदार आणि सार्थ अस्तित्वाकरता ती काही प्रमाणात बाह्य आर्थिक मदतीवर अवलंबून असल्याचे कळले. ह्यामुळेच सॅल्यूटने ह्या वर्षीचा पुरस्कार पूर्णपणे ह्या संस्थेवरच केंद्रित करण्याचे ठरवले. आणि संस्थेला देणगी देण्याबरोबरच ह्या संस्थेच्या संचालकांना आणि व्यवस्थापकांना आमंत्रित करण्याचे ठरवले. त्याचबरोबर येथील प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाच्या जोरावर विकलांगांसाठी असलेल्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ब्रीजस्पर्धांमध्ये अनेक पदके मिळवणाऱ्या अनेक निवृत्त सैनिकांपैकी दोघांना विशेष पुरस्कार ''१० फेब्रुवारी २०१८'' ह्या दिवशी सारस्वत सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. गौतम ठाकूर ह्यांच्या




Ahval text18.indd 21 2/2/2019 4:43:05 PM

हस्ते वितरित करण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रमच भारावून टाकणारा आणि लक्षवेधी ठरला. तद्नंतर खास लोकाग्रहास्तव इच्छुकांसाठी ह्या संस्थेला भेट देण्यासाठीही सॅल्यूटने प्रयत्नपूर्वक आयोजन केले.

अहवालवर्षी सॅल्यूटचे सुरूवातीपासुनचे मार्गदर्शन , खंदे कार्यकर्ते आपल्या आरमाराविषयक व्यासंगाने विशेष महत्त्वपूर्ण ठरलेले आणि आमच्यापैकी अनेकांचे अल्पावधीत अतिशय जवळचा मित्र झालेले डॉ. सचिन पेंडसे ह्यांचे १३ जानेवारी १८ रोजी आकस्मिकरित्या निधन झाले. त्यांच्या नावाने सॅल्यूटतर्फे व्याख्यानमाला आयोजित करणाऱ्या सॅल्यूटचा मानस आहे आणि ती लवकरच सुरू होईल.

अ. मो. भंडारे स. श्री. पाटणकर

# अर्थ विभाग



अजित करंदीकर (अध्यक्ष) विजय वझे( कार्यवाह)
सदस्य : अमिता ठोसर, प्रकाश सडेकर, अवधूत गोळे,अरूण भंडारे, विवेक दांडेकर, सुरेंद्र तरे, उल्हास हंबर्डे, विनोद सौदागर, विनय देसाई, विजय वैद्य, विजय जोशी

महाराष्ट्र सेवा संघाच्या अर्थ विभागातर्फे अर्थ, कायदा व व्यवस्थापन या विषयावर दि. ०१.०४.२०१७ ते ३१.०३.२०१८ या काळात खालील कार्यक्रम सादर झाले.

१) १६.०७.२०१७ ''वस्तू व सेवा कर'' (जी.एस.टी.) आणि सामान्य माणूस या विषयावर सी.ए. गोखले यांच्या भाषणाचा कार्यक्रम झाला. गोखले यांनी नवीन आलेल्या ''वस्तू व सेवा '' कराबद्दल आणि त्याचा सामान्य माणसांच्या जीवनावर होणाऱ्या परिणामाबद्दल उत्तम मार्गदर्शन केले.

२) २४.०९.२०१७ ''बँकेचे घटते व्याजदर आणि गुंतवणूकीचे पर्याय'' या विषयावर श्री. निखील नाईक यांचा भाषणाचा कार्यक्रम झाला श्री. नाईक यांनी वेगवेगळे गुंतवणुकीचे पर्याय सांगताना म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूकीचे फायदे विशद केले.

३) ''डिजिटल जमान्यात बँकांचे भवितव्य'' या विषयावर रिझर्व बँकेचे सेवानिवृत्त चीफ जनरल मॅनेजर श्री. डी.जी. काळे यांचा भाषणाचा कार्यक्रम झाला. त्यांनी डिमॉनेटायझेशन व त्यानंतर झालेल्या सुधारणाबद्दल विस्तृत माहिती दिली. बँकेतील वाढलेल्या एन.पी.ए.बद्दल ही चर्चा केली.

४) १९.११.२०१७ ''भारतीय अर्थव्यवस्था काल, आज आणि उद्या'' या विषयावर सिडनॅहम कॉलेजचे निवृत्त प्राचार्य डॉ. वसंत तायडे यांचे अर्थपूर्ण भाषण झाले.

५) १५.१२.२०१७ ''विवेके धनसंपदा'' या विशेष कार्यक्रमात डॉ. अभिजित फडणीस, श्री. निखील नाईक आणि सी.ए. संजीव गोखले यांनी अनुक्रमे, शेअर बाजार, म्युच्युअल फंड आणि गुंतवणूकीविषयी प्राप्तीकर या विषयावर उद्बोधक चर्चा केली.

६) ०४.०२.२०१८ ''कौटुंबिक समस्या आणि संबंधित कायदे'' या विषयावर श्री. शिरीष इनामदार (निवृत्त अतिरिक्त उपायुक्त) महाराष्ट्र पोलीस यांनी उत्कृष्ट प्रबोधन केले.

७) १६.०२.२०१८ ''अर्थसंकल्प पुढे नेणारा की मागे खेचणारा'' या विषयावर डॉ. अभिजित फडणीस यांचे उत्तम भाषण झाले.

८) ०४.०३.२०१८ या दिवशी सालाबादानुसार ''गणेश केशव करंदीकर उद्योजक पुरस्कार'' हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. हे पुरस्काराचे ५ वे वर्ष. ''आजी केअर होम आणि हेल्थ सर्विसेस'' चे श्री. प्रसाद भिडे ; बिग बिजिनेस ॲडव्हर्टाइझर्सच्या श्रीमती प्राजक्ता पाटील आणि प्रिझम सर्जीकेअरचे श्री. प्रियाल नांगरे यांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. दीपक घैसास यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. पुरस्कार विजेत्यांची मुलाखत श्री. संजीव गोखले आणि श्रीमती अमिता ठोसर यांनी घेतली.

९) ०६.०४.२०१८ '' जागतिक घडामोडी आणि त्याचा भारतीय शेअर बाजारावर परिणाम'' या विषयावर डॉ. अभिजित फडणीस यांचे उद्बोधक भाषण झाले.

अर्थ विभागाच्या वरील कार्यक्रमांना महाराष्ट्र टाईम्स चे मध्यम प्रायोजकत्व लाभल्याने श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

विजय वझे प्रकाश सडेकर अजित करंदीकर
कार्यवाह अध्यक्ष



Ahval text18.indd 22 2/2/2019 4:43:05 PM

# साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

कार्यकारी मंडळ
अध्यक्ष : सौ. नंदिनी हंबर्डे, कार्यवाह : सौ. सुषमा पाटणकर, सहकार्यवाह : श्री. अरूण भंडारे
सभासद : द. व. कुलकर्णी, रवींद्र लाड, सदाशिव पोतदार, विनोद सौदागर, सुनीता देवधर, सौ. सुहास कराडकर, सौ.रश्मी अनगळ, सौ. मेधा देव
ग्रंथालयाची स्थापना : १ मे १९७९, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त अ वर्ग ग्रंथालय

ग्रंथालयाचा वर्ष २०१७ -१८ चा अहवाल सादर करताना कार्यकारी मंडळाला विशेष आनंद होत आहे. १ मे २०१८ रोजी ग्रंथालयाला ३९ वर्षे पूर्ण होत असून पूर्णपणे संगणकीकृत असे हे सुसज्ज ग्रंथालय असून या ग्रंथालयात अनेक दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ तसेच इतर विषयांवर आधारीत असे सर्व मिळून ३५००० इतके ग्रंथांची संख्या असलेले हे समृद्ध ग्रंथालय आहे. ग्रंथालय वाचनाचा आनंद तर पुरवीत असतेच त्याचप्रमाणे वाचकांसाठी व सभासदांसाठी विविध विषयांवर कार्यक्रमांचा आनंदही पुरवीत असते त्याच म्हणजे २०१७- १८ या वर्षातील सादर केलेल्याा ग्रंथालयीन कार्यक्रमांचा तपशील पुढेः

१) ग्रंथालय दर सोमवारी वाचक संवाद हा कार्यक्रम अगदी थोडक्यात राबवित असते. त्यात अनेक विषयांवर चर्चा केली जाते. विविध वाचनाचे विषय आदान प्रदान होतात. त्याचप्रमाणे दि. ३१/०७/२०१७ रोजी सायं. ६ वा. विशेष वाचक संवाद सादर करण्यात आला. वाचक संवादाचा विषय ''भारतीय चित्रपटाचे जनक कै. दादासाहेब फाळके यांचा जीवन प्रवास.'' या कार्यक्रमात दादासाहेबांचा जीवन प्रवास , कार्ये , कर्तृत्व, योगदान, किस्से आणि त्यांच्या आठवणी या सर्वांचे सादरीकरण दादासाहेबांचे नातू श्री. चंद्रशेखर पुसाळकर आणि नातसून मृदुला पुसाळकर यांनी केले. आणि ह्या सादरीकरणाला हातभार लावण्यास मुलाखतकार होते कृष्णकुमार गावंड.

२) दि. ११/१०/२०१७ सेतू माधवराव पगडी स्मृती व्याख्यान वर्ष ६ वे
विषय : ''सुफी परंपरा इस्लामाचा आत्मा '' (उगम विकास आणि मानवतावाद), प्रमुख पाहुणे : श्री. अब्दुल कादर मुकादम (सुफी परंपरेचे अभ्यासक , विचारवंत) या आगळ्यावेगळ्या विषयाला अत्यंत अभ्यासपूर्ण भाषण त्यास श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद.

३) १५/१०/२०१७ - वाचक प्रेरणा दिन
या दिवशी डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या ग्रंथांचे प्रदर्शन ग्रंथालयात भरविण्यात आले तसेच विशेष वाचक संवाद घेण्यात आला. त्यात कलामांवरील आधारित अनेक पुस्तकांवर चर्चा करण्यात आली. या वाचक संवादास देखील खूप सभासद उपस्थित होते.

४) दि. २८/१०/२०१७ - लेखक आपल्या भेटीला : कार्यक्रम : याद न जायेSSS, वक्ते : श्री. अंबरीश मिश्र(प्रसिद्ध पत्रकार, संगीत समीक्षक , लेखक) अंबरीश मिश्र त्यांचा प्रवास याबद्दल त्यांनी श्रोत्यांसमोर अगदी मनमोकळा खुलासा केला. त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या लेखनाची माहिती त्यांनी अगदी थोडक्यात समोर आणली. या कार्यक्रमास अगदी भरपूर प्रतिसाद मिळाला.

५) दि. ०५/१२/२०१७ कार्यक्रम ''लौकिक अलौकिक''
महाराष्ट्रातील तपस्वी संशोधक, अनेक ग्रंथ निर्माण करणारे ज्ञानतपस्वी लेखक श्री. रा.चि. ढेरे यांचा ''लौकिक अलौकिक'' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. हा कार्यक्रम आपल्या ग्रंथालयासहित ५ संस्थांनी मिळून सादर केला. या कार्यक्रमास मान्यवर निर्माते-उमेश कुलकर्णी /अभिवाचन करण्यास माधुरी पुरंदरे, ज्योती सुभाष, जितेंद्र जोशी, हर्षद वेदपाठक इत्यादी आणि प्रमुख अतिथी श्री. मुकुंद कुळे (म.टा.चे ज्येष्ठ पत्रकार) रा.चि. ढेरेंच्या पुस्तकांचे अभिवाचन करण्यात आले. त्या अभिवाचनाच्या कार्यक्रमामुळे लोकांना ढेरेंची संशोधन , लिखाण जाणून घेण्यास मदत झाली व त्यास खरंच लोकांनी खूप प्रतिसाद दिला.

६) वाचक संवाद : दि. १८/१२/२०१७, प्रमुख पाहुण्या : ॲड. श्रीमती अंजली ठाकूर
विषय : न्यायालयीन कथाकथन - ठाकूर यांनी न्यायालयीन कथांचे अगदी साध्या सोप्या श्रोत्यांना खिळवून ठेवणाऱ्या शब्दात या कथांचे सादरीकरण केले अनेक वेगवेगळ्या स्वरूपाच्या कथांचे हे सादरीकरण लोकांस ऐकण्यास मिळाले. या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद लाभला.

७) दि. ०३/०२/२०१८ पुस्तक प्रकाशन सोहळा , लेखक : श्री. रवींद्र लाड, पुस्तक : कोकणातील कातळशिल्पे आणि सिंधू संस्कृती, प्रमुख पाहुणे : तेजस गर्गे (संचालक पुरातत्व आणि संग्रहालय विभाग महाराष्ट्र शासन)
श्री. तेजस गर्गे यांच्या हस्ते कोकणातील कातळशिल्पे आणि सिंधू संस्कृती या पुस्तकाचे प्रकाशन केले आणि लेखक रवींद्र लाड यांनी आपल्या पुस्तकाचा परिचय करून दिला.



Ahval text18.indd 23 2/2/2019 4:43:05 PM

८) दि. २६/०२/१८ कुसुमाग्रज जन्मदिन
या दिवशी विशेष वाचक संवाद घेण्यात आला. अगदी सर्व वाचकांनी कुसुमाग्रजांच्या कविता /लेख/कथा/नाटक यांवर आपल्या हव्या त्या शब्दात कथाकथन केले.
९) दि, २२/०३/१८ ते २४/०३/१८ असे सलग ३ दिवस ''प्रिय रसिक'' -पॉप्युलर प्रकाशन आणि ग्रंथालयातर्फे हा कार्यक्रम सादर करण्यात आला.
पुष्प पहिले : तीन गानमूर्ती (२२.०३.१८ )
पं. चिदानंद नगरकर, पं. के.जी. गिंडे, पं. एस.सी. आर.भट
या कार्यक्रमात श्री. भटकळ, बाक्रे, सारंगी आंबेकर, प्रणती म्हात्रे या संगीत क्षेत्रातील मान्यवरांनी बंदिर्शींचे उत्कृष्ट सादरीकरण केले.
पुष्प दुसरे : दि. २३/०३/१८
डॉ. आनंदीबाई जोशी आणि डॉ. रखमाबाई सावे-राऊत या पहिल्या महिला डॉक्टर यांच्या कर्तृत्वाविषयी प्रा. हरी नरके यांनी व्याख्यान सादर केले.
पुष्प तिसरे : दि. २४/०३/२०१८ 'संवाद दोन नाटककारांशी' यात दोन नाटककार श्री. अजित दळवी व शेखर ताम्हाणे यांच्याशी अष्टपैलू अशी गुणी अभिनेत्री संपदा जोगळेकर यांनी संवाद साधला.
या तीन दिवसांच्या कार्यक्रमास खूप प्रतिसाद लाभला.

दि. २८/०४/१७ ते ०१/०५/१७ ''वसंत व्याख्यानमाला - वर्ष २१वे''
१) न.चि.केळकर ग्रंथालय २) ग.क. खांडेकर ग्रंथालय ३) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मुलुंड विभाग अशा तीन ग्रंथालय मिळून ४ दिवसांचा भव्य कार्यक्रम सादर करण्यात आला.
पुष्प पहिले : वक्ते : श्री. विनायक परब (पत्रकार आणि संरक्षक विश्र्लेषक ), विषय : भारत-चीन संरक्षण संबंध यावर व्याख्यान
पुष्प दुसरे : वक्ते : डॉ. अनिल काकोडकर (अणूशास्त्रज्ञ) , विषय : ज्ञानयुगाची आव्हाने
पुष्प तिसरे : मुलाखतीवर आधारित कार्यक्रम, सहभाग : श्री. शरद खातू ( माजी आमदार व कामगाार नेते), श्री. विठोबा ह. नाईक (माजी सह- मुख्य अग्निशमन अधिकारी मुंबई), श्री. नील देसाई (उद्योजक)
पुष्प चौथे : वक्ते : श्री. विनय हर्डीकर (लेखक/पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते), विषय : मुलुंडने मला काय दिले.
अशा प्रकारे चारही दिवस अतिशय सुंदर कार्यक्रम होत गेले आणि त्याला खूप मोठा प्रतिसाद मिळाला.
ग्रंथालयाचा असाही एक अनोखा उपक्रम ''ग्रंथालय तुमच्या दारी'' या उपक्रमात ''सीटी ऑफ जॉय'' मुलुंड पश्चिम या गृहसंकुलामध्ये आपले ग्रंथालय दर बुधवारी सायं. ठीक ६ वा. हजेरी लावते. व त्यास भरभरून तेथील वाचकांनी प्रतिसाद दिला आहे व त्यास भरपूर प्रमाणात स्रियांनी या वाचनाचा लाभ उठवला आहे. लहान मुले वाचन करण्यास तेथे येतात. या उपक्रमात मोठे सदस्य एकूण३९ असून तर बाल २ आहे. ६ ते ७ च्या दरम्यान पुस्तकाची देवाण घेवाण केली जाते वाचकांच्या मागणीनुसार पुस्तके व अंक पुरविली जातात. दिवाळी अंकांचा आनंदही आम्ही या वाचकांस दिवाळीत देतो. त्यालाही सर्व वाचकांचा प्रतिसाद असतो. या उपक्रमासाठी ग्रंथालयाचे कार्यकारी मंडळ व कर्मचारी खूप मेहनत होत असतात.

महाराष्ट्र सेवा संघाच्या विश्वस्त, कार्यकारी मंडळ, सभासद आणि ग्रंथालयाच्या वाचकांकडून व कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

सुषमा पाटणकर — कार्यवाह

नंदिनी हंबर्डे — अध्यक्ष

# ज्ञानेश्वर पुस्तक पेढी अहवाल-२०१७/२०१८

सन २०१७-१८ मध्ये इयत्ता ९वीचे एकूण ८ विद्यार्थी
सन २०१७/१८ मध्ये इयत्ता १०वी चे एकूण ११ विद्यार्थी

प्रदीप वाईकर / उमेश काणेकर-सेवक — कु. श्रद्धा कांबळे (ग्रंथपाल)

## साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| ४३२ | २०९ | ६४१ |

३१-३-२०१८ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३५,८६४
अहवाल वर्षात १,१४,६९९/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**
**३१-३-२०१८ अखेर सभासद**

| | | | |
|---|---|---|---|
| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | ग्रंथ विभाग-सिटी ऑफ जॉय |
| २०२ | ६१ | ५०० | ३० |
| अंक विभाग | सन्माननीय सदस्य | सिटी ऑफ जॉय -बाल | एकूण सदस्य |
| १६१ | २ | २ | ९८३ |

## ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ४६ | ७ | १ | १२ | ६६ |
| हिंदी | ८ | - | २ | - | १० |
| इंग्रजी | १९ | - | १५ | ३ | ३७ |
| एकूण | ७३ | ७ | १८ | १५ | ११३ |

## दिवाळी अंक योजना २०१७-२०१८

| | |
|---|---|
| सभासद संख्या | १६९ |
| अंकाचे प्रकार | ८० |
| अंकांच्या एकूण प्रती | २१४ |
| खरेदी किंमत रुपये | २७,६७८/- |

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | १२ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवशक्ती, नवाकाळ, सकाळ, लोकमत, रत्नागिरी टाईम्स, तरुण भारत, प्रहार, पुढारी, सामना, नवराष्ट्र |
| हिंदी | २ | नवभारत टाईम्स, नवभारत |
| इंग्रजी | ७ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, फ्री प्रेस जर्नल, इकॉनॉमिक टाईम्स, एशियन एज, हिंदुस्थान टाईम्स, डी.एन्. ए. |
| गुजराथी | २ | मुंबई समाचार, गुजराथी समाचार |



Ahval text18.indd 25 2/2/2019 4:43:05 PM

**सायंदैनिके**

| **प्रकार** | **संख्या** | **नाव** |
|---|---|---|
| मराठी | २ | महानगर, संध्यानंद |
| हिंदी | १ | सामना |
| इंग्रजी | २ | आफ्टरनून, मिड-डे |

# दृष्टिसेवा अभ्यासिका

अध्यक्ष - सुनीता देवधर, कार्यवाह - रश्मी अनगळ, कोषाध्यक्ष - नंदिनी हंबर्डे

सभासद - प्रियांका मोकाशी, विनोद सौदागर, श्री. सदाशिव पोतदार, श्री. द.व. कुलकर्णी

दृष्टीसेवा अभ्यासिकेत २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी भाग घेऊ इच्छिणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांची मिटींग नॅबतर्फे (नॅब इंडिया), वरळी येथे १५ जून २०१७ रोजी घेण्यात आली. दृष्टीसेवेच्या शिक्षकांची मीटिंग १६ जून २०१७ रोजी , महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड येथे घेऊन शिक्षकांच्या सोयीनुसार नवीन वर्षाचे वेळापत्रक आखण्यात आले. मराठी माध्यमासाठी ९, इंग्रजी व हिंदी माध्यमासाठी प्रत्येकी २ असे एकूण १३ विद्यार्थी घेऊन, १९ जून २०१७ रोजी अभ्यासिकेची सुरुवात झाली.

१३ जून २०१७ रोजी, मार्च २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या शालान्त परिक्षेचा निकाल जाहीर झाला होता. १४ पैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. कुर्बान शेख व आदर्श विश्वकर्मा या दोघांचा निकाल राखून ठेवला होता. अथक प्रयत्नांनंतर ५ जुलै २०१७ रोजी या दोघांचा 'उत्तीर्ण' असा निकाल हाती आला. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन सलग ५ व्या वर्षी दृष्टीसेवेचा निकाल १०० टक्के लागला. कुर्बान शेख या विद्यार्थ्याने ७६.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. दिनांक १४ जुलै २०१७ रोजी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा श्री. सिद्धीविनायक बर्वे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ८ ऑगस्ट २०१७ रोजी विद्यार्थ्यांना 'सरस्वती सन्मान -गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळ्या'मध्ये गौरविण्यात आले.

प्रथम सत्रात विद्यार्थ्यांच्या चाचणी परिक्षेनंतर त्यांना विशेष, वैयक्तिक मार्गदर्शन देण्यास सुरूवात केली. प्रथम सत्राच्या अखेरीस दि. २७ नोव्हेंबर २०१७ रोजी कल्याण जवळील 'एन्जॉय फार्म हाऊस' येथे नेली होती. विद्यार्थ्यांनी तेथे मांडण्यात आलेले शास्त्रीय प्रयोग समजून घेतले. त्यांनी पाण्यात खेळण्याचा मनमुराद आनंद घेतला.


द्वितीय सत्रात २२जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत विद्यार्थ्यांची शालांत परीक्षा मंडळाकडून घेण्यात आलेल्या शालांत परीक्षेत , मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मुलुंड विद्यामंदिर तर इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना महर्षी दयानंद हायस्कूल हे केंद्र मिळाले होते. ३ मार्च ते १७ एप्रिल या कालावधीत झालेल्या या परीक्षेसाठी मुलुंड विद्यामंदिरच्या ११ व हृषिकेश काजरेकर व सलोनी बर्नवाल या विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

रश्मी अनगळ , कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष



Ahval text18.indd 26 2/2/2019 4:43:05 PM

# **विज्ञान विभाग** (विज्ञान प्रेमींचा मंच)



*विज्ञान*

अध्यक्ष : सतीश पाटणकर कार्यवाह : नि. दे. विशेष सहभाग : गुरूप्रसाद कार्लेकर, विद्याधर जोशी
तरूण सदस्य : २०१६-१७ चे सर्व, वैभव बुद्धदेव, चिन्मय देशमुख, अथर्व जोशी, जयश्री सोनावणे, वरदा नवाथे, रत्नेश गवळी

सॅल्यूट इंडिया उपक्रमाचा पसारा विज्ञान विभागाच्या सोबतीनेच वाढल्यामुळे ह्या दोन गोष्टी आता एकमेकांत मिसळून गेल्या प्रमाणे झाल्यात. विज्ञान हा जसा विशेष करून तरूणाईसाठी जवळचा विषय तसाच सॅल्यूट उपक्रमही सळसळत्या उत्साहाचा. सॅल्यूटच्या वार्षिक वाटचालीबद्दल स्वतंत्र लिहिले आहेच. पण निव्वळ विज्ञानाचा म्हणावा असा एकच मोठा कार्यक्रम ह्या वर्षी आयोजित झाला. ''राष्ट्रीय विज्ञान दिवस'' साजरा करण्यासाठी (२८/०२ च्या ऐवजी, सोयीसाठी) २३ फेब्रुवारी ह्या दिवशी शालेय मुलांच्या विज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या. सुमारे २६ शाळांच्या ४२ संघांनी ह्यात भाग घेतला. ८वी , ९वी साठी आयोजलेल्या ह्या स्पर्धांना मुलुंडच्या १२-१५ शाळा तर होत्याच पण कित्येक शाळा भांडुप, घाटकोपर, कांदिवली, कल्याण, ठाणे, वांगणी अशा लांबूनही हजर होत्या. स्पर्धांचे नियोजन, आयोजन, संपूर्ण तयारी आणि कार्यवाही ह्या सगळ्याचा भार विज्ञानाच्या तरूण सभासदांनी उत्कृष्टपणे उचलला. अध्यक्ष, कार्यवाह आणि इतर प्रौढ सभासदांनी केलेल्या मार्गदर्शनाखाली तरूण फळीने फार मेहनतीने आणि मोठ्या कल्पकतेने स्पर्धेच्या विविध टप्प्यांची आखणी केली होती.

शेवटची फेरी वादविवाद (डिबेट) स्वरूपाची असल्याने विद्यार्थ्यांचा खरा कस लागला. चर्चेचे विषय दोनच दिवस आधी देण्यात आले होते; परंतु विद्यार्थ्यांनी वयाच्या आणि अनुभवाच्या मानाने खूपच रंजकपणे आणि आवेशाने ही फेरी रंगवली. तीन परीक्षकांनीही ह्या फेरीसाठी संघांना उत्तम दिग्दर्शन तर केलेच पण आपली मतेही मोजक्या शब्दात पण प्रभावीपणे मांडली. ह्या अंतिम फेरीचे आणि एकूणच स्पर्धेचे उपस्थित शिक्षक,पालक व विद्यार्थ्यांनी भरभरून कौतुक केले आणि ह्या उत्तम उपक्रमाबद्दल सेवा संघाचे आणि तरूण कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानले.

३० मार्च रोजी 'झी दिशा' साप्ताहिकाच्या सहयोगाने 'स्टिफन हॉकींग' ह्या नुकत्याच दिवंगत झालेल्या आणि अवघ्या विश्वाला चटका लावून काळाच्या पडद्याआड गेलेल्या वैज्ञानिकाला श्रद्धांजली राहण्याच्या दृष्टीने व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला. डॉ. बाळ फोंडके आणि तरूण वैज्ञानिक डॉ. अमोल दिघे ह्यांनी स्टिफन हॉकींग आणि त्यांचा प्रदीर्घ अभ्यास ह्यांचा थोडक्यात पण ओघवत्या भाषेत परिचय करून दिल्यानंतर उपस्थितांकडून प्रश्न मागवण्यात आले. प्रश्नोत्तरांच्या रूपात ह्या दोन्ही तज्ज्ञांकडून उपस्थित विज्ञान प्रेमींना भरभरून शंकानिरसन करून मिळाले. इतक्या गहन विषयाच्या चर्चेला अतिशय सहज व परिचयाच्या भाषेत ह्या तज्ज्ञांनी समर्पक उत्तरे दिल्यामुळे सुमारे २५० विज्ञानप्रेमी तृप्त होऊन गेले.

ह्या वर्षी अनेक छोटे कार्यक्रम करण्यावर भर न देता विज्ञान विभागाने 'हटके' विचार करत तरूणांना अधिकाधिक जोडून घेण्यासाठी त्यांना मोकळीक तर दिलीच , शिवाय कार्यक्रमांच्या तयारीत पडण्याऐवजी पुढच्या वाटचालीसाठी बांधणी करण्यासाठी युवकांना प्रोत्साहित केले. आणि ह्याचाच परिणाम म्हणून ह्या युवावर्गाने काही वेगळा विचार करत पी. आय.एन्. (पार्टनर इन्स्टिट्युशन नेटवर्क) आणि सी.ए. (कम्यनिटी अँम्बेसेडर) अशा दोन प्रणालींचा प्रस्ताव दिला आहे. ह्याची पूर्वतयारी म्हणून संस्थेची वेबसाईट नव्याने पुनर्रचित करून शिवाय स्वतंत्र मोबाईल ॲप बनवण्याचाही मानस आहे. ह्यावर काम करण्यास काही महिन्यांचा अवधी लागेल आणि त्याचे परिणाम दिसण्यासाठी १ ते २ वर्षांचा वेळ द्यावा लागेल. मात्र अशा संकल्पना घेऊन तरूण वर्ग पुढे येत आहे हे खूपच अभिमानास्पद आणि कौतुकास पात्र आहे.

नितीन देशपांडे , कार्यवाह — सतीश पाटणकर, अध्यक्ष



Ahval text18.indd 27 2/2/2019 4:43:06 PM

# ऐरोली शाखा

श्री. प्रदीप र. सप्रे - अध्यक्ष, श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह, श्री. कि.म. पेंढरकर - कोषाध्यक्ष, श्री. सुधीर बागाईतकर - सहकार्यवाह

**सदस्य :** श्री. चं. ना. वझे (पदसिद्ध), श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) , श्री. कि.म. पेंढरकर, श्री. मु. शं. बालंखे , सौ. संगीता जोशी, सौ. आरती सप्रे, सौ. अंजली पेंढरकर, सौ. दर्शना निमसे, श्री. निनाद जोशी, श्री.अनिल कुऱ्हेकर, सौ. प्रीती देशपांडे

ऐरोली शाखेचा १७व्या वर्षाचा अहवाल सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. या वर्षातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे ऐरोली शाखेतील शुभकार्यासाठी सेवा पुरविणाऱ्या अधिकृत कंत्राटदाराची नियुक्ती. या कामासाठी संस्थेचे विश्वस्त श्री. र. दे. धामणकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. गेल्या वर्षी शाखेच्या नूतनीकरणासाठी खर्च झालेला मोठा निधी, वाढती स्पर्धा व बदललेल्या तंत्रज्ञानामुळे निरुपयोगी होत चाललेल्या टेलिकॉम टॉवरचे घटत चाललेले उत्पन्न यामुळे शाखेच्या आर्थिक ताळेबंदाची नव्याने जुळवाजुळव करण्याची गरज लक्षात घेत समितीने डेकोरेशन व हाउसकीपींग बरोबर कॅटरींगसाठी देखील अधिकृत कंत्राटदाराची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. सदर कामांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांचे सखोल विश्लेषण, प्रत्यक्ष कंत्राटदारांशी चर्चा यावर अत्यंत पारदर्शी प्रक्रियेचा अवलंब करत समितीने मे. नाटेकर डेकोरेटरर्स एन्ड कॅटरर्स यांची दि.३१.०१.१८ पासून ऐरोली शाखेचे डेकोरेशन, हाउसकीपींग व कॅटरींगचे अधिकृत कंत्राटदार म्हणून पुढील ५ वर्षांसाठी नियुक्ती केली. या कामासाठी समितीला ऐरोली शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. आ.रा.कट्टी यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. समितीचे अध्यक्ष श्री. र. दे. धामणकर व विशेष सहाय्यक श्री. चंद्रशेखर कुलकर्णी यांचा ऐरोली शाखेतर्फे वर्धापनदिनी सत्कार करण्यात आला तसेच डॉ. आ.रा.कट्टी यांनी समितीच्या कामात केलेल्या विशेष योगदानाबद्दल व ऐरोली शाखेचे अध्यक्ष म्हणून केलेल्या गौरवपूर्ण कामगिरीबद्दल त्यांचा एका विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

या वर्षीच्या कार्यक्रमांची सुरुवात वर्धापनदिनाने झाली. संस्थेतर्फे भावगीते व भक्तीगीते यांवर आधारीत ''भक्तीसुगंध'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुकन्या जोशी यांचे अप्रतिम निवेदन आणि शेफाली कुलकर्णी यांच्या बहारदार गायनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. संस्थेच्या स्थापनेस ८० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या एका विशेष कार्याक्रमामध्ये ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे यांची सौ. सुषमा देशपांडे यांनी घेतलेली मुलाखत चांगलीच रंगली. संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त श्री. म.बा. देवधर यांनी या कार्यक्रमात ऐरोली शाखेला रु.८००००/– ची देणगी घोषित केली. ही देणगी एका विशेष कार्यक्रमात ऐरोली शाखेला सुपूर्द करण्यात आली त्या समयी शाखेतर्फे श्री. म.बा. देवधर यांचा सत्कार करण्यात आला.

प्रतिवर्षीप्रमाणे ऐरोली परिसरातील शाळांमधून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व ज्येष्ठ शिक्षक सन्मान सोहळा हे कार्यक्रम उत्साहात साजरे झाले. या प्रसंगी बदलापूर येथील 'गुरुकुल विद्यालया'चे संस्थापक श्री. श्रीकांत देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेतर्फे दिवाळीनिमित्त सादर केला जाणारा ''दिवाळी पहाट'' हा कार्यक्रम ऐरोलीकरांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. यावर्षी गाजलेल्या मराठी व हिंदी गाण्यांवर आधारीत आयोजित केलेल्या ''सूरप्रभात'' हा अनोखा कार्यक्रम रसिकांना उदंड कलानंद देऊन गेला. संस्थेच्या 'सॅल्यूट इंडिया' याउपक्रमाचा एक भाग म्हणून ऐरोली शाखेतर्फे सैन्यदलातील नोकरीच्या संधी व उपयुक्ता याबद्दल माहिती देणारा 'करियर इन डिफेन्स' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. निवृत्त अधिकारी मेजर सुभाष गावंड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला ऐरोली परिसरातील विद्यार्थी व पालक यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

मैत्री, कलाविभाग व ग्रंथालय हे शाखेचे विभाग उत्तम कार्य करत आहेत. त्यांचे सविस्तर अहवाल स्वतंत्रपणे जोडले आहेत. अभ्यासिका या अत्यंत विद्यार्थीप्रिय उपक्रमाचा लाभ केवळ ऐरोली परिसरातील नव्हे तर दूरदूरच्या भागातील विद्यार्थी देखील घेत असतात. आत्तापर्यंत सुमारे ९५०० विद्यार्थ्यांनी या सेवेचा लाभ घेतलेला आहे.


दरवर्षीप्रमाणे श्री अच्युत महाराज सत्संग मंडळाच्या संयुक्त विद्यमाने भागवत सप्ताह साजरा करण्यात आला प. पू. श्री जितेंद्रनाथजी महाराज यांच्या मधुर वाणीतून केलेल्या भागवताच्या निरुपणाला श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. प्रभात चित्रमंडळ, परिसरातील इतर सेवाभावी संस्था ऐरोली शाखेच्या कार्यात सहकार्य करीत आहेत.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे ऐरोली शाखेची वाटचाल उत्तम चालू आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापक समिती सर्व कर्मचारी, कंत्राटदार तसेच इतर सर्व संबंधितांची आभारी आहे.

धन्यवाद !

शंकर वीरकर (कार्यवाह) प्रदीप सप्रे (अध्यक्ष)

# कला विभाग - ऐरोली शाखा



श्री. किशोर म. पेंढरकर - अध्यक्ष, श्री. प्रदीप श्री. नाटेकर - उपाध्यक्ष
श्री. सुधीर बागाईतकर, श्री. मु.शं. बालंखे, श्री. अनंत धर्माळे,श्री.विजय जोशी.

वर्ष २०१७–१८ या कालावधीचा कला विभागाचा अहवाल सादर करण्यास आम्हास आनंद होत आहे. अहवाल वर्षात विविध विषय आणि आशय असणारे दर्जेदार कार्यक्रम देण्याचा विभागातर्फे प्रयत्न करण्यात आला.

या वर्षातील कार्यक्रमाची सुरुवात राजकीय घडामोडीवर भाष्य करणाऱ्या ''नागरिक'' या चित्रपटाने करण्यात आले. जयप्रसाद देसाई दिग्दर्शित या चित्रपटात डॉ. श्रीराम लागू, दिलीप प्रभावळकर, सचिन खेडेकर, सुलभा देशपांडे, नीना कुलकर्णी, मिलिंद सोमण अशा कसलेल्या कलाकारांच्या भूमिका या चित्रपटात आहेत. राजकीय वर्तुळातील संघर्ष व त्यामुळे होणारी सर्वसामान्यांची परवड यावर हा चित्रपट प्रकाश टाकतो.

समांतर चित्रपटाच्या चळवळीत निर्माण झालेला ''अर्थ'' हा महत्त्वाचा चित्रपट आहे. शबाना आझमी, स्मिता पाटील, राजकिरण, रोहिणी हट्टगंडी, कुलभूषण खरबंदा इ. कलाकारांचा कसदार अभिनय व आशयधन कथानक यामुळे ''अर्थ'' अतिशय सुंदर बनला आहे. स्त्रीमुक्तीचा उद्‌गार या चित्रपटातून प्रकट झाला आहे.

जून महिन्यात मानवी मनाला ओढ लागते ती पावसाची व त्यात चिंब भिजण्याची. त्यानिमित्ताने ''कवितारंग'' पावसाळी कवि संमेलन आयोजित करण्यात आले. यात सुप्रसिद्ध कवि प्रा. अशोक बागवे, सतिश सोळांकुरकर, साहेबराव ठाणगे, संदेश ढगे व नारायण लाळे यांनी नव्या–जुन्या कवितांची हळूवार मांडणी करून सर्व रसिक प्रेक्षकांना काव्यरसात चिंब भिजविले.

लघुपट हे दिग्दर्शकाच्या अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम आहे. साहित्यात जे महत्त्व लघुकथेचे तेच महत्त्वदृष्यमाध्यमामध्ये लघुपटांना आहे. विविध विषय हाताळणारे व विविध महोत्सवात पारितोषिक प्राप्त सहा लघुपट प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आले. अतिशय आल्हाददायक मनाला चिंब भिजवून टाकणारा लघुपट ''पहिला पाऊस'' ते मनाला सुन्न करून टाकणारा व गुढतेचे वलय असणारा An Interview with Mr. Chako असे विषयाचे वैविध्य व हाताळणी दर्शवणाऱ्या ह्या लघुपट महोत्सवाने उपस्थित प्रेक्षक अतिशय भारावून गेले.

भारताच्या स्वातंत्र्य दिनाला अहवाल वर्षात ७१ वर्ष झाली त्याचे औचित्य साधून धर्मेन्द्र,प्रिया राजवंश ,जयंत,बलराज सहानी असे कलाकार असलेल्या श्री.मदन मोहन यांनी संगीत दिलेला व चेतन आनंद यांनी दिग्दर्शित केलेला १९६२ सालच्या भारत–चीन युद्धावर आधारित ''हकीकत'' हा चित्रपट दाखवण्यात आला. लडाख मध्ये चीनी सैनिकांनी घेरलेल्या भारतीय सैनिकांची सुटका करणाऱ्या कॅप्टन बहादूरसिंग या शूर भारतीय सैनिकाची रोमहर्षक कथा पाहताना प्रेक्षक रोमांचित झाले.

भारतीय चित्रपटाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेला सत्यजित रे दिग्दर्शित सुप्रसिद्ध बंगाली चित्रपट ''पाथेर पांचाली'' हा बंगाली चित्रपट दाखविण्यात आला. चित्रपटाचा विषय त्याची हाताळणी,सहज सुंदर अभिनय यामुळे उपस्थित प्रेक्षक अतिशय भारावून गेले.
दरवर्षी प्रमाणे कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने सुप्रसिद्ध गायक निनाद आजगांवकार यांच्या गाण्यांचा कार्यक्रम 'कोजागिरी संध्या ' आयोजित करण्यात आला होता. गाण्यांच्या रसात न्हाऊन त्यानंतर सर्व रसिक प्रेक्षकांनी चंद्राच्या साक्षीने इमारतीच्या गच्चीवर अल्पोपहार व मसाला दुधाचा आनंद घेऊन कोजागिरी पौर्णिमेचा उपक्रम उत्साहाने साजरा केला गेला.

अभिनेते शशीकपूर यांच्या स्मरणार्थ त्यांची प्रमुख भूमिका व निर्मिती असलेला शाम बेनेगल यांनी दिग्दर्शित केलेला ''जुनून'' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट दाखविण्यात आला. १८५७ च्या बंडाचा संदर्भ असणारा प्रेम,त्याग,आणि संघर्ष या भोवती फिरणाऱ्या या चित्रपटात शशी कपूर, त्यांची पत्नी जेनिफर केन्डॉल,शबाना आझमी, नसिरुद्दीन शहा, नफिसा अली आणि कुलभूषण खरबंदा या कलाकारांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या.

प्रेक्षकांच्या आग्रहास्तव व मागील सादर केलेल्या लघुपट महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद पाहून अजून एका लघुपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. त्यात परत एकदा विविध विषयांना हाताळणारे ''बापदेव'', 'वारा', 'मूक', 'संतुलन', 'वरवंटा' असे पाच लघुपट दाखविण्यात आले. त्यालाही प्रेक्षकांचा अतिशय सुंदर प्रतिसाद लाभला.

मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरातील कवींच्या कविता आपण विविध कवी संमेलनात नेहमीच ऐकत असतो. उर्वरित महाराष्ट्रातील कवींच्या कविता प्रेक्षकांना ऐकण्याची संधी मिळावी यासाठी खास वैदर्भीय कवींचे ''फाये अत्तराचे'' हे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यात बबनराव सराडकर, सौ. चित्राताई कहाते, अंबादास घुले, राजेश महल्ले तसेच संजय धोटे या विविध पुरस्कार प्राप्त



Ahval text18.indd 29 2/2/2019 4:43:06 PM

कवी –कवयित्रींनी आपल्या कविता अतिशय उत्कृष्टपणे सादर केल्या. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्त्रियांवरील अत्याचार, देशातील घसरलेली राजकीय परिस्थिती इत्यादीचे भेदक दर्शन घडविणाऱ्या कवितांनी व कवींनी केलेल्या त्यांच्या उत्कृष्ट मंचीय सादरीकरणांनी प्रेक्षकांना वास्तवतेची जाणीव करून दिली व प्रेक्षकांनी सर्व सादरीकरणांना उत्तम प्रतिसाद दिला.

एकपात्री अभिनय स्पर्धेचे यंदाचे १२ वे वर्ष होते. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळावा व एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. मुंबई तसेच कल्याण,डोंबिवली,ठाणे,अंबरनाथ,बदलापूर,वाशी ते पनवेल पर्यंतचे कलाकार दरवर्षी आपली कला सादर करतात व कलाकारांचा दर्जा वर्षानुवर्षे उंचावतच आहे हे पाहून आम्हास समाधान वाटते.

मराठी चित्रपटामध्ये नजीकच्या काळात जे नाविन्यपूर्ण प्रयोग झाले त्यात ''श्वास'' नंतर ''धग'' या चित्रपटाचे नाव आवर्जून घ्यावे लागेल सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री उषा जाधव व सर्वोत्कृष्ट बाल कलाकार हंसराज जगताप हे राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त नितीन दीक्षित यांची कथा व पटकथा तसेच शिवाजी लोटन पाटील यांनी दिग्दर्शित केलेला ''धग'' हा चित्रपट दाखवण्यात आला.

फेब्रुवारी, मार्च आल्यावर सर्व सामान्य माणसाला वेध लागतात ते अर्थसंकल्पाचे. दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीमती सुनिती नागपूरकर यांनी अतिशय सोप्या पद्धतीने सुंदर व ओघवत्या शैलीत अर्थसंकल्पाचे अभ्यासपूर्ण विवेचन व विश्लेषण केले. त्यांच्या भाषणानंतर प्रेक्षकांबरोबर झालेल्या संवादामध्ये देखील प्रेक्षकांनी अतिशय अभ्यासपूर्ण प्रश्न विचारले व वेळेच्या कमतरतेमुळे शेवटी कार्यक्रम साडेतीन तासांनतर आटोपता घ्यावा लागला.

श्रीदेवी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचा अत्यंत गाजलेला व अविस्मरणीय भूमिका असलेला बालू महेन्द्र दिग्दर्शित हिंदी चित्रपट ''सदमा'' दाखवण्यात आला यात कमल हसन व श्रीदेवी यांचा अतिशय सुंदर अभिनय प्रेक्षकांना पाहायला मिळाला. 'सुरमई अखियों से', 'ये जिंदगी गले लगा ले' या गीतांमधून इलाया राजाचे सुमधुर संगीत ऐकत प्रेक्षकांनी श्रीदेवी यांच्या स्मृती जागवल्या.

अहवालवर्षी मराठी भावगीतांची ९१ वर्षाची वाटचाल पूर्ण झाली त्या निमित्ताने सुप्रसिद्ध गायक विनायक जोशी यांचा ९१ वर्षाची भावगीतांची वाटचाल उलगडून दाखविणारा 'स्वरभाव यात्रा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. २०१७ मध्ये रविवारच्या 'लोकरंग' या लोकसत्तेच्या पुरवणीत श्री. विनायक जोशी यांचे भावगीतावरील 'स्वरभाव यात्रा' हे सदर वाचकांमध्ये अतिशय लोकप्रिय ठरले होते. भावगीतांचा तोच प्रवास मंचीय स्वरूपात 'स्वरभाव यात्रा' या कार्यक्रमातून सादर केला गेला व या कार्यक्रमाने अहवाल वर्षातील कार्यक्रमांची सांगता झाली.

प्रभात चित्रमंडळाच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात येणाऱ्या चित्रपटांनंतर होणाऱ्या चर्चेत प्रेक्षक अतिशय उत्साहाने भाग घेतात व चित्रपटात दाखवलेल्या विविध सामाजिक विषयांवर आपली मते मांडून चर्चा करतात. प्रभात चित्रमंडळातर्फे मार्गदर्शक म्हणून संतोष पाठारे, अमित चव्हाण इ. प्रतिनिधी उपस्थित राहून चर्चेत सहभागी होऊन मार्गदर्शन करतात.

कला विभागाच्या सर्व उपक्रमांना मुख्य कार्यकारी मंडळाचा कायमच पाठिंबा असतो त्याबद्दल कलाविभाग कार्यकारी मंडळाचा आभारी आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापन समिती, सर्व कर्मचारी, कंत्राटदार, विविध वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व रसिक प्रेक्षकांचे कला विभागातर्फे आभार.

| | |
|---|---|
| सुधीर बागाईतकर | किशोर पेंढरकर |
| (कार्यवाह) | (अध्यक्ष) |



Ahval text18.indd 30 2/2/2019 4:43:06 PM

# मैत्री

१) संगीता जोशी (अध्यक्ष), २) दर्शना निमसे (कार्यवाह), ३) सुनीता देवधर (सल्लागार)
**सदस्य**- प्रीती देशपांडे, छाया देशमुख, आरती सप्रे, मंदा कोंडविलकर.

प्रतिवर्षाप्रमाणे या अहवाल वर्षात मैत्रीने अनेक प्रबोधनात्मक वैचारिक माहितीपूर्ण आणि त्याबरोबरच मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले. अहवाल वाचनाने वर्षभरात सादर झालेल्या कार्यक्रमांच्या सुखद स्मृतींना उजाळा देण्याचे हे कार्य निश्चितच आनंद देणारे आहे.

संस्कार शिबिर–दि.१६ ते २३ एप्रिल या दरम्यान ८ ते १४ वयोगटातील मुला–मुलींसाठी संस्कार शिबिर घेण्यात आले. या शिबिरात एकूण १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विविध कला गुणांना वाव मिळावा या हेतूनेच मुलांना प्रशिक्षण देण्यात आले.

दि.१६ एप्रिल २०१७ – नेस्ले तर्फे मुलांना विविध पाककृती सोप्या पद्धतीने कशा करायच्या याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन विशाखा यांनी केले.

दि. १७ एप्रिल २०१७ –'कलाविष्कार' या सदरात मुलांना काही विषय देण्यात आले होते, मुलांनी त्यानुसार कविता, नाटक सादर केले व प्रबोधनात्मक संदेश देणारा असा कार्यक्रम सादर केला.

दि. १८ एप्रिल २०१७ – झुम्बा फिटनेस विथ डान्स – झुम्बा प्रशिक्षक अन्तेश पुजारी यांनी झुम्बा या फिटनेस डान्स प्रकारचे प्रशिक्षण मुलांना दिले.

दि. १९ एप्रिल २०१७ – कापडी पिशव्या शिवणे – मंदा कोंडविलकर यांनी मुलांना कापडी पिशव्या शिवण्याचे प्रशिक्षण दिले.

दि.२० एप्रिल २०१७ – मॅथ्स ट्रिक्स – स्मिता सावंत यांनी मुलांना गणिताच्या सोप्या पद्धतीने बेरीज, वजबाकी, वर्ग, कसे करायचे ह्याच्या टिप्स दिल्या.

दि.२१ एप्रिल २०१७ – हस्तकला – या सदरात दीपिका साळसकर यांनी पेपर पासून टोपल्या, फ्लॉवरपॉट, कमळाचे फूल बनवण्याचे प्रशिक्षण दिले.

दि. २२ एप्रिल २०१७ – स्केचिंग – श्री अविनाश सरांनी पेन्सिलच्या साह्याने चित्र कसे रेखाटायचे याचे प्रशिक्षण सोप्या पद्धतीने दिले.

२३ एप्रिल २०१७ – समारोप – प्रमुख पाहुण्या डॉ. नीलिमा पाटील यांच्या हस्ते झाला त्यांनी मुलांशी संवाद साधत मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. आठवडाभर शिकलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. मुलांनी छान सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मनोगते व्यक्त केली. दरवर्षी प्रमाणे चौत्रगौरीची आरास मांडण्यात आली असे हे संस्कार शिबिर– निरोगी, सात्विक, धर्मशील, सामर्थ्यवान पिढी घडविण्याचे योग्य उराशी बाळगून कार्यरत आहे.

२१ जून ते २३ जून २०१७ – तीन दिवसीय योगसाधना शिबिर – या शिबिरात योग शिक्षिका श्रीमती निशा बर्वे तसेच डॉ. भूपेन ममानिया यांनी प्राणायाम, विविध आसन प्रकार, योगासनाची माहिती देऊन मोलाचे मार्गदर्शन केले. मैत्रिणींचा उत्तम प्रतिसाद लाभला.

दि.७ जुलै २०१७ – डान्स विथ फिटनेस – महिलांसाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात झुंम्बा प्रशिक्षिक अन्तेश पुजारी यांनी महिलांना म्युझिकवर झुंम्बा डान्स शिकवून फिटनेस कसा ठेवावा याचे प्रशिक्षण दिले. महिलांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

दि.१९ जुलै २०१७ – पुष्परचना – कार्यशाळा – प्रशिक्षक श्रीमती कल्पना बांबळे यांनी या कार्यक्रमात विविध तऱ्हेच्या पुष्परचना कशा करायच्या फुलांची आरास कशी करायची याचे मार्गदर्शन प्रात्यक्षिकासह केले. तऱ्हेतऱ्हेची फुले–पाने यांच्या सजावटीने सभागृह सुगंधित, उत्साहित, व आनंदमय झाले होते. सख्यांनी या कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. व कार्यशाळेचा आनंद लुटला.

दि.१५,१६,१७ सप्टेंबर २०१७ – भव्य ग्राहकमेळावा – महिला उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशायने मैत्री तर्फे दरवर्षी ग्राहक मेळाव्याचे आयोजन केले जाते. या वर्षीही ५२ महिला उद्योजक सहभागी झाल्या.श्रीमती भारती वरे - ब्युटीशियन, यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन झाले. त्यांनी महिला उद्योजकांना मोलाचे मार्गदर्शन केले.

दि.१८ नोव्हेंबर २०१७ – मैत्री वर्धापनदिन सोहळा – समस्त स्त्री वर्गासाठी स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात रांगोळी, पुष्परचना, पर्सेस तयार करणे, गायन, कवितावाचन, वेशभूषा, झुम्बा, शास्त्रीय पारंपारिक नृत्य प्रकार अशा विविध स्पर्धा ठेवण्यात आल्या. महिलांनी उत्फूर्तपणे सहभाग घेऊन कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. साक्षी पाटील, रुपाली भोईर, स्मिता सावंत, शोभा बांगर, अन्तेश पुजारी यांनी परीक्षकांचे काम पाहिले. प्रमुख पाहुण्या श्रीमती रश्मी राणे यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी सर्टिफिकेट वाटण्यात आली.



Ahval text18.indd 31 2/2/2019 4:43:06 PM

दि. १६ डिसेंबर २०१७ – आरोग्यम् धनसंपदा – या कार्यक्रमात के.ई.ए.म. हॉस्पिटलच्या समुपदेशक श्रीमती साधना भातखंडे यांनी शारीरिक व मानसिक स्वास्थ्य या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. आजच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्य बाबत कसे जागृत राहावे याचे मार्गदर्शन करून उपस्थितांच्या प्रश्नोत्तरे व त्यांच्याशी संवाद साधून सोडविण्याचा प्रयत्न केला. याही कार्यक्रमाला स्त्री–पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि.१ जानेवारी २०१८ – आपले जुने पारंपारिक खेळांचे जतन व्हावे. त्यांचे ऐतिहासिक महत्व जपण्यासाठी व महिलांना एक दिवस मनमुराद खेळांचा आनंद लुटण्यासाठी १) चमचा लिंबू, २)बटाटा शर्यत, ३)बेडूक उड्या, ४)टिकली लावणे अश्या विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. उत्फुल्ल, आनंदी वातावरणात महिलांनी सहभागी होऊन खेळाचा आनंद लुटला.

दि. २० जानेवारी २०१८ – संक्रात गोडी वाढविणारी – मकर संक्रांतीच्या निमित्ताने एक आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात मैत्रीच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांनी पाककृती कार्यशाळा बेतली. यात दडपे पोहे, ७ कप वडी, मशरूमची भाजी, (नवीन प्रकार) आलेपाकवडी असे पदार्थ शिकवण्यात आले. स्वयंपाकाच्या संदर्भातील खास सुगरनींचे सल्ले सुद्धा मैत्रिणींनी सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. पाककृतींचा आस्वादहीमहिलांनी मनमुराद घेतला. धम्माल खेळ खेळू या स्पर्धेतील विजेत्या सख्यांना बक्षिसे हळदी–कुंकू , तिळगूळ व वाण म्हणून तुळशीचे रोप देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

२४ फेब्रुवारी २०१७–प्लास्टिक आणि थर्माकोल मुक्त पर्यावरण - या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या श्रीमती अस्मिता गोखले यांनी पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी कमीतकमी प्लास्टिकचा वापर कसा करावा तसेच हे प्लास्टिक इतरत्र कुठेही न फेकता रिसायकलिंगसाठी काही संस्था कार्य करतात अशांकडेच द्यावे जेणेकरून त्यापासून इंधन तयार होईल व पर्यावरणाला धोकाही उदभवणार नाही याचे मार्गदर्शन करून उपस्थित स्त्री–पुरुष वर्गाला पटवून संगितले त्यांनी पर्यावरण हा एक अनमोल वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुस्थितीत हस्तांतरित करायचा आहे याची जाणीव उपस्थितांना करून दिली अशा तऱ्हेने या वर्षात अनेक दर्जेदार कार्यक्रम सादर करण्यात आले. विशेषतः समस्त स्त्री–वर्गाला सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद खऱ्या अर्थाने लुटता आला. सर्व कार्यक्रमांना मैत्रिणींनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला हे पाहून आम्हालाही अधिकाधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते,आनंद,उत्साह वाढतो,द्विगुणित होतो. पुढील वर्षातही असेच दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न असेल.

लोभ आहेच,तो वृद्धिंगत व्हावा.
धन्यवाद!!

दर्शना निमसे, कार्यवाह — संगीता जोशी, अध्यक्ष



Ahval text18.indd 32 2/2/2019 4:43:06 PM

# सुनीता म. देवधर ग्रंथालय

अध्यक्ष - मुकुंद बालंखे , कार्यवाह - प्रीती देशपांडे
सभासद :- माधवी देशमुख, सुनीता देवधर (सल्लागार)

रसिकांना, वाचकांना सप्रेम नमस्कार !

ज्ञानाचा साठा हा अविनाशी असतो. ही एक अशी गुंतवणूक असते की जिच्या व्याजाला कधी मरण नसते. म्हणूनच श्रेष्ठ ग्रंथ ही सर्वात सुरक्षित बचत मानली जाते. अशा अनेक उत्तमोत्तम ग्रंथाचा खजिना असणारे सुनिता देवधर ग्रंथालय हे ऐरोलीमध्ये भूषणावह असे एकमेव आहे.

मागीलवर्षी नमूद केल्याप्रमाणे समाजमाध्यामाचा विळखा अधिकच तीव्र असून सुद्धा ग्रंथालयाची सभासद संख्या टिकून आहे. ही अत्यंत समाधानाची व उत्साहवर्धक बाब आहे. सभासद वाढीचे प्रयत्न सुरु ठेवत असताना निदान आहे ती संख्या टिकून ठेवणे हे लक्ष आम्ही ठेवले आहे.

यावर्षी शैक्षणिक वाटचाल या सदराखाली शैक्षणिक क्षेत्रात मार्गदर्शक  म्हणून मान्यता प्राप्त अशा शैलजा मुळे यांचे उद्बोधक भाषण झाले, अनेक विद्यार्थी व पालकवर्ग यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. बालविभागासाठी दरवर्षी एखादा कार्यक्रम करावा या संकल्पनेनुसार निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. 'मुलांसाठी गप्पाष्टक' या कार्यक्रमांतर्गत डॉ. मनीषा बर्वे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच सर्व स्पर्धकांना प्रशस्ती पत्रक देऊन त्यांना प्रोत्साहनपर शाबासकी दिली. डॉ.बर्वे यांनी अनेक गोष्टी, किस्से सांगून मुलांचे तसेच उपस्थित पालकांचे मनोरंजन केले. वर नमूद केलेले २ कार्यक्रम झाले परंतु अहवाल वर्ष संपण्याअगोदर अजून एखादा कार्यक्रम करण्याचा मानस आहे.

या वर्षी सर्व पुस्तकांना बारकोड लावण्याचे काम पूर्ण झाले. दैनंदिन व्यवहारात बारकोडच्या उपयुक्ततेची प्रचिती येत आहे. संगणकीय प्रणाली उत्तमरित्या काम करत असल्याने बारकोड अंकित पुस्तकांमुळे कामकाजात सुसूत्रता आली. यावर्षी मार्च मध्ये ग्रंथमोजणी करताना बारकोडचा उपयोग करून संगणकीय प्रणाली मध्येच ही ग्रंथमोजणी करण्यात आली. याचा फायदा असा झाला की अनेकांचे सहकार्य घेण्याची गरज न भासता केवळ २ ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी हे काम ३ दिवसांत पूर्ण केले. ग्रंथमोजणी अहवाल व्यवस्थापनास सादरकरण्यात आला आहे.

दिवाळीअंक योजना, वाचकांची आर्थिक देणगी, देणगीदाखल अनेक उत्तम ग्रंथ, पुस्तक खरेदी या सारखे सर्व उपक्रम व्यवस्थित रित्या सुरु आहेत. सभासदांचा संतोष हेच ग्रंथालयाचे ब्रीद असून त्यासाठी ग्रंथाल्याच्या समितीचे सभासद व कर्मचारी कायम प्रयत्नशील असतात.

समाजामध्ये वाचनाची आवड जोपासणे, उत्तम ग्रंथ उपलब्ध करणे व विविध कार्यक्रमद्वारे उत्तम विचारांचा प्रसार करणे या ग्रंथालयाच्या त्रिसूत्रीसाठी व्यवस्थापनेचे नेहमी बहुमोल मार्गदर्शन मिळत असते. यासाठी अध्यक्ष श्री.प्रदीप सप्रे, कार्यवाह श्री.वीरकर यांचे आभारी आहोत.त्याचप्रमाणे सर्व कर्मचारी वर्गाचे आभार व अभिनंदन.

प्रीती देशपांडे, कार्यवाह | मुकुंद बालंखे, अध्यक्ष



Ahval text18.indd 33 2/2/2019 4:43:06 PM

# ऐरोली ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| **वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी** | **वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ** | **एकूण** |
|---|---|---|
| ७६ | २९५ | ३७९ |

**३१-०३-२०१८रोजी उपलब्ध ग्रंथ - ७८६७**

अहवाल वर्षात १५,२२२/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील** ३१-३-२०१८ अखेर सभासद

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | |
|---|---|---|---|
| १५ | ४५ | २०५ | |
| ग्रंथ -अंक विभाग | दीर्घ मुदत सदस्य | अंक विभाग | एकूण |
| २३२ | — | १५ | ४९७ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| **प्रकार** | **मासिके** | **त्रैमासिके** | **पाक्षिके** | **साप्ताहिके** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ७३ | १ | ६ | १२ | ९२ |
| हिंदी | १ | - | ४ | - | ५ |
| इंग्रजी | ८ | - | १४ | १२ | ३४ |
| एकूण | ८२ | १ | २४ | २४ | १३१ |

**दिवाळी अंक योजना**

सभासद संख्या : ५६

अंकाच्या एकूण प्रती : ७५

खरेदी किंमत रुपये : १०,५५२ /-

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| **प्रकार** | **संख्या** | **नाव** |
|---|---|---|
| मराठी | १० | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, वार्ताहर पुढारी, धावते नवनगर |
| हिंदी | १ | नवभारत टाईम्स |
| इंग्रजी | ६ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, डीएन्ए, मुंबई मिरर. फ्री प्रेस, हिंदू |

# अभ्यासिका

आरती सप्रे (अध्यक्ष) - अंजली पेंढरकर (कार्यवाह)
सभासद : मुकुंद शं. बालंखे , छाया देशमुख

नमस्कार,
प्रतीवर्षी, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड ऐरोली शाखेच्या अभ्यासिकेचा उंचावलेला आलेख मांडताना आम्हाला आनंद होत आहे. अभ्यासिकेसारखा अत्यंत उपयुक्त उपक्रम अर्थातच वाढत्या मागणीचा आहे. त्यानुसार जुलै २०१६ पासून विद्यार्थी सभासद प्रवेश संख्या वाढवून ५५० केली. त्याला प्रतिसाद मिळून लागेचच जानेवारी ते जून १७ च्या सत्रातही एकून ५५० प्रवेश झाले.
विद्यार्थ्यांसाठी देणगी आलेली विविध विषयाची अभ्यास क्रमिक व इतर अभ्यासोपयोगी पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. नवीन कपाटांमध्ये ही पुस्तके अभ्यासक्रमांच्या वर्गवारीनुसार लावून त्यांची उत्तम व्यवस्था ठेवण्यात येते. वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची १८० पुस्तके अभ्यासिकेत उपलब्ध आहेत. ओळखपत्र जमा करून ही पुस्तके अभ्यासिकेतच वाचण्यासाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. नवीन टेबले, खुर्च्या,कपाटे, एल.इ.डी.लाईट्स, पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय तसेच सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. यांसारख्या सोयी सुविधा व त्यांची योग्य ती व वेळोवेळी घेतलेली काळजी त्यामुळे या उपक्रमास विश्वासाहर्ता प्राप्त झाली आहे. विद्यार्थी सभासद, पर्यवेक्षक यांच्या वेळोवेळी सूचना वहीत आलेल्या सूचनांचा पाठपुरवठा, त्याच बरोबर प्रवेश आणि वर्तणूकीची शिस्त या सर्वांची सांगड हेच अभ्यासिकेचे वैशिष्टपूर्ण यश आहे.१ जानेवारी २०१८ रोजी सुरु झालेल्या सत्रात मार्च २०१८ अखेरीस ४४१ प्रवेश झाले.

महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड, ऐरोली शाखेचे अभ्यासिकेचे पर्यवेक्षक, कर्मचारी वर्ग, दुरुस्ती व देखभाल समितीचे सहकार्य तसेच मुख्य समितीचे मार्गदर्शन व प्रोहोत्सान यामुळे अभ्यासिकेचे नियोजन आणि व्यवस्थापन उत्तम होऊ शकते.
धन्यवाद!

सौ. अंजली पेंढरकर
(कार्यवाह)

सौ. आरती सप्रे
(अध्यक्ष)



Ahval text18.indd 35 2/2/2019 4:43:07 PM

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड तर्फे देण्यात आलेले सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार व कै. ल.ग. गद्रे शैक्षणिक पुरस्कार तसेच सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार व महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार खालीलप्रमाणे

| **वर्ष** | **साहित्यिक पुरस्कार** | **कलाकार पुरस्कार** | **शिक्षक / संस्था पुरस्कार** |
|---|---|---|---|
| १९९४ | श्रीमती शांता शेळके | श्रीमती भक्ती बर्वे | सर्वश्री. वसंतराव आगाशे व  हरेराम बोडस |
| १९९५ | श्री. शं.ना.नवरे | श्रीमती ललिता पवार | सर्वश्री. चंद्रकांत मापारी व  कृ.ल.पटवर्धन |
| १९९६ | श्रीमती सरोजिनी वैद्य | श्री. यशवंत देव | श्री. सय्यद गुलाम दस्तगीर व श्रीमती रेणू दांडेकर |
| १९९७ | श्री. अनिल अवचट | श्रीमती सुचेता भिडे चापेकर | सर्वश्री. अनिल जोशी व  भानसिंग पाटील |
| १९९८ | श्री. रत्नाकर मतकरी | श्री. बाबूराव सडवेलकर | श्री. अरुण जोशी व श्रीमती विजया वाड |
| १९९९ | श्रीमती मंगला गोडबोले | श्री. रामदास पाध्ये | श्री. रामकुमार सावंत व श्रीमती वर्षा सहस्त्रबुध्दे |
| २००० | श्रीमती आशा बगे | श्री. शि. द. फडणीस | सर्वश्री. वामन हेर्लेकर, कुलकर्णी व अरुण फाटक |
| २००१ | श्री. लक्ष्मण लोंढे | श्रीमती प्रभा अत्रे | श्री. न.ल. गाडगीळ व श्रीमती सुचेता पडळकर |
| २००२ | श्री. ह.मो. मराठे | श्रीमती प्रिया तेंडुलकर | सावरकर प्रतिष्ठान ,सांगली |
| २००३ | श्रीमती अरुणा ढेरे | श्री. भरत दाभोळकर | दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तांसगांव |
| २००४ | श्री. मारुती चित्तमपल्ली | श्रीमती स्मिता तळवलकर | राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा, पुणे |
| २००५ | श्री. अशोक जैन | श्री. अरविंद गजेंद्रगडकर | सर्वश्री श्री. बाळासाहेब माने व विठ्ठल माने |
| २००६ | श्रीमती प्रतिभा रानडे | श्री. नितीन देसाई | सर्वश्री. रमेश लोणारे व मनोहर नरांजे |
| २००७ | श्रीमती मीना प्रभू | श्री. मोहन जोशी | प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक |
| २००८ | श्रीमती उमा कुलकर्णी | श्री. अशोक पत्की | आविष्कार, रत्नागिरी |
| २००९ | श्री. जगदीश खेबूडकर | श्रीमती उषा मंगेशकर | वात्सल्य ट्रस्ट, मुंबई |
| २०१० | डॉ. जयंत नारळीकर | श्री. दिलीप प्रभावळकर | लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा |
| २०११ | श्री. ना.धों. महानोर | सौ. वीणा सहस्त्रबुद्धे | कुष्ठरोग निवारण समिती, नेरे, पनवेल. |
| २०१२ | डॉ. विजया राजाध्यक्ष | श्री. विक्रम गोखले | मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र - पुणे |
| २०१३ | प्रा. शेषराव मोरे | श्री. प्रशांत दामले | सह्याद्रि आदिवासी बहुविध सेवा संघ, देवबांध |
| २०१४ | श्री. निरंजन घाटे | श्री. उत्तम पाचारणे | हेल्पर्स ऑफ दी हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर |
| २०१५ | डॉ. प्रतिमा इंगोले | डॉ. मोहन आगाशे | स्नेहज्योती निवासी अंध विद्यालय, दापोली |
| २०१६ | डॉ.माधुरी शानभाग | सुहास जोशी | आधार मतिमंद मुलांची शाळा, मालेगाव |
| २०१७ | डॉ.तारा भावाळकर | अशोक सराफ | अमेय पालक संघटना, खोणी, डोंबिवली |
| २०१८ | श्री. मुकुंद टाकसाळे | आप्पा वढावकर | ————- |

## पं. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार

| **वर्ष** | **पुरस्कारप्राप्त विद्वान** | **क्षेत्र** |
|---|---|---|
| २०११ | श्री. देवदत्त गोविंद पाटील | अध्ययन व अध्यापन |
| २०१२ | डॉ. भाग्यलता पाटसकर | अध्ययन व अध्यापन |
| २०१३ | डॉ. मल्हार कुलकर्णी | अध्ययन व अध्यापन |
| २०१४ | श्री. गणेश्वर सांब दीक्षित | अध्ययन व अध्यापन |
| २०१५ | डॉ. मधुसूदन पेन्ना | अध्ययन व अध्यापन |



Ahval text18.indd 36 2/2/2019 4:43:07 PM

| | | |
|---|---|---|
| २०१६ | डॉ. रवींद्र मुळे | अध्ययन व अध्यापन |
| २०१७ | डॉ. अंजली पर्वते | अध्ययन व अध्यापन |

वैविध्यपूर्ण साहित्यकृतींना प्रोत्साहन मिळावे म्हणून 'साहित्य साधना' पुरस्कार न.चिं. केळकर ग्रंथालयाने १५-०४-२००६ पासून सुरू केला आहे.

| **वर्ष** | **पुरस्कारप्राप्त लेखक** | **साहित्यकृती** |
|---|---|---|
| २००६ | श्री. भारत सासणे | शुभवर्तमान |
| २००७ | श्री. गिरीश प्रभुणे | पारधी |
| २००८ | डॉ. संजय ओक | अवनत होई माथा |
| २००९ | श्री. सुमेध वडावाला | मनश्री |
| २०१० | डॉ. संजय ढोले | प्रेमाचा रेणू |
| २०११ | श्री. गिरीश कुबेर | युद्ध जिवांचे |
| २०१२ | श्रीमती आशा आपराद | भोगिले जे दुःख त्याला |
| २०१३ | डॉ. सदाशिव शिवदे | ज्वलज्ज्वलनतेजस संभाजी राजा |
| २०१४ | हेमंत देसाई | बॉम्बे टॉकीज |
| २०१५ | डॉ. इसादास भडके | गन गन भोवरी |
| २०१६ | बालिका ज्ञानदेव /रवींद्र कोरडे | मॅगझिनीतून सुटतेय गोळी /धुसर झालं नसतं गांव |
| २०१७ | श्री. दत्तात्रय व. कुलकर्णी | टेक्नॉलॉजी ऑल्वेज विन्स |
| २०१८ | श्री. अभिजित घोरपडे | गाथा पर्यावरणाची |

**विविध कलाक्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराचा सन्मान (एक कलाकार - एक संध्याकाळ)**

| **वर्ष** | **कलाकाराचे नाव** | **क्षेत्र** |
|---|---|---|
| २००५ | श्री. दशरथ पुजारी | संगीत |
| २००६ | श्री. के.ज.पुरोहित (शांताराम) | साहित्य |
| २००७ | श्री. भालचंद्र पेंढारकर | नाट्य. |
| २००८ | श्री. सुहास भालेकर | लोकनाट्य |
| २००९ | श्री. मोरेश्वर कुंटे | मंदिर कोशकार |
| २०१० | श्री. प्रभाकर जोग | व्हायोलीन वादक, संगीतकार |
| २०११ | श्री. भा. ल. महाबळ | साहित्य |
| २०१२ | श्रीमती पुष्पा पागधरे | गायन |
| २०१३ | श्री. चंद्रकांत खोत | साहित्य |
| २०१४ | श्री. वसंत आजगावकर | गायन |
| २०१५ | श्री. जयंत सावरकर | नाट्य |
| २०१६ | श्री. दिनू रणदिवे | पत्रकार |
| २०१७ | श्री. याकुब सईद | दूरदर्शनचे माजी संचालक, निर्माते, दिग्दर्शक |



Ahval text18.indd 37 2/2/2019 4:43:07 PM

**समाजसेवेत कार्यरत असणाऱ्या स्त्री समाजसेवकांना दिला जाणारा, 'सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार'**

| वर्ष | समाजसेवकाचे नाव | संस्था / क्षेत्र |
|---|---|---|
| २०१५ | श्रीमती सुनंदा पटवर्धन | 'प्रगती प्रतिष्ठान', जव्हार |
| २०१६ | श्रीमती उषा मडावी | गोंदिया |
| २०१७ | प्रीती पाटकर | प्रेरणा प्रतिष्ठान, मुंबई |
| २०१८ | चेतना गाला-सिन्हा | माण देशी फाऊंडेशन |

**देशाला सुरक्षित ठेवणाऱ्या संरक्षणदलातील आणि गृहरक्षकदलातील वीरांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या 'प्रेरणा' पुरस्काराचे मानकरी**

| वर्ष | पुरस्काराचे मानकरी | क्षेत्र |
|---|---|---|
| २०१५ | ग्रुप कॅप्टन दिलीप परुळकर, व्ही.एस.एम. (निवृत्त) | भारतीय हवाई दल |
| | कमांडर रवींद्र पाठक | भारतीय नाविक दल |
| | सुभेदार मेजर अशोक काशीद | भारतीय भूदल |
| | श्री. अप्पा परब | इतिहास संशोधक |
| २०१६ | कमांडर श्रीरंग एन्. बिजूर (निवृत्त) | भारतीय नौदल |
| | शिरीष जनार्दन इनामदार (निवृत्त) अतिरिक्त उपायुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग | महाराष्ट्र पोलिस, |
| | लेफ्टनंट कर्नल सुरेश पाटील (निवृत्त) | भारतीय भूदल |
| | विंग कमांडर जान्हवी खानोलकर | भारतीय हवाई दल |
| २०१७ | अमोल बोरीवाले, अँथनी दास परेरा | पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर' |

**स्व. अुद्धवराव त्रिविक्रम आठले स्मरणार्थ 'संस्कृत भाषा प्रसार' पुरस्कार**

| | |
|---|---|
| २०१५ | सौ. तरंगिणी खोत |
| | सौ. अर्चना कतिरा |
| २०१६ | श्री. माधव केळकर |
| | श्री. राजेंद्र दातार |
| २०१७ | डॉ. आशा गुर्जर |
| | सौ. संगीता अंभोरे |

# सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

अभिमानास्पद यशांचे अनेक टप्पे गाठत अहवालवर्षी विजयादशमी २०१७ ला संस्थेला ८० वर्षे पूर्ण झाली. अमृतमहोत्सवी वर्षाप्रमाणेच वर्षपूर्तीनिमित्त सस्त्रचंद्रदर्शन सोहळा अंतर्गत २ दिमाखदार कार्यक्रमांचे आयोजन अनुक्रमे ऐरोली व मुलुंड येथे करण्यात आले. रसिकांनी या दोन्ही कार्यक्रमांना उदंड प्रतिसाद दिला.

**पुष्प पहिले :** ऐरोली येथे ५ ऑगस्ट२०१७ रोजी ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मानसोपचार तज्ज्ञ डॉ. मोहन आगाशे यांची सुरेख मुलाखत घेतली श्रीमती सुषमा देशपांडे यांनी. कलाकार म्हणून डॉ. आगाशे यांच्या यशस्वी कारकीर्दीचा मागोवा घेतानाच मानवी मनाचे अंतरंग या मुलाखतीत सुरेखपणे उलगडले.

**पुष्प दुसरे :** मुलुंड येथे १४ ऑक्टोबर२०१७ रोजी बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमात विशेष देणगीदारांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर संस्थेच्या ८० वर्षांच्या वाटचालीचा मागोवा घेणारी ध्वनिचित्रफीत सादर करण्यात आली. संस्थेच्या मुलुंड व ऐरोली शाखेतील विविध विभागांच्या ८० वर्षांतील वाटचालीचा (विशेषतः ७५ ते ८० या कालावधीतील) मागोवा घेणाऱ्या 'आपुलकी' च्या विशेष अंकाचे प्रकाशन तसेच संस्कृत पंडित प्रभाकर भातखंडे यांच्या विविध भाषांतील लेखांचे, काव्यांचे संकलन असलेल्या 'खिचडी' या पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमात झाले. 'श्री. बालाजीची सासू' या कार्यक्रमात 'बाल्यावस्था ते वृद्धावस्था' हा स्त्रियांचा जीवनपट विनोदाच्या अंगाने उलगडला गेला. वयाची पंचाहत्तरी/ ऐंशी वर्षे पूर्ण करणाऱ्या संस्थेच्या निवडक ज्येष्ठ सभासदांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप mss80@fun.com या संस्थेच्या ८० वर्षांच्या यशस्वी वाटचालीला अभिवादन करणाऱ्या तरुणाईच्या अनोख्या अविष्काराने झाला. 'नृत्य, नाट्य (संस्कृत) कविता वाचन या माध्यमांतून सुरेख सादर झालेल्या आविष्कारात संस्थेच्या विविध विभागांची माहिती देण्यात आली. 'नोटाबंदी' वरील नाट्याविष्कार व नृत्याविष्कार रसिकांची मने जिंकून गेला.

## शाब्बास स्वाती !!

महाराष्ट्र सेवा संघाच्या दृष्टिसेवा अभ्यासिकेतून अर्ज क्र. १७ भरून २०१७-१८ या वर्षात शालांत परीक्षेस बसलेल्या महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांमधून **स्वाती सेमवाल** ही दृष्टीबाधित विद्यार्थिनी ८६.२० टक्के गूण मिळवून प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली.